

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine February 2024 - Pages - 52**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ४ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-






अयोध्या नगरीमध्ये दि. २२ जानेवारी २०२४ रोजी
झालेल्या श्री राम लल्ला मूर्ती प्रतिष्ठापनेच्या
निमित्ताने संस्थेच्या धनुर्धारी श्रीराम मंदिरात
चित्रकलेतून 'राम सेतू' हा उपक्रम
आश्रम वसतिगृहातील विद्यार्थी
व चित्रकला मार्गदर्शिका यांनी सादर केला.
आश्रमीय विद्यार्थ्यांनी
'राम सेतू' साठी ड्रॉईंग पेपरवर
सुमारे २००० चित्रे काढून रंगविली आणि
संस्थेच्या प्रवेशद्वारा पासून राम मंदिराचा गाभाऱ्या
पर्यंत २५० फूट लांबीचा 'राम सेतू' बनविला

## ✻ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० ✻




दि. १२ जानेवारी २०२४
वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. अभय एम. हरसुलकर, विभाग प्रमुख, पुना कॉलेज ऑफ फार्मसी (फार्मास्युटिकल बायोटेक्नॉलॉजी भारती अभिमत विद्यापीठ) यांचा सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, सवमेत संचालक श्री. रमेश कुलकर्णी

## कै. डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ, नाशिक

दि. ३० जानेवारी २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी दिपप्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील पालक - शिक्षक असोसिएशन प्रतिनिधी सौ. सोनाली खैरनार





वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी
प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या सत्कार करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ,
समवेत डावीकडून मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, प्राचार्य डॉ. मनोज भालेराव,
संचालक श्री. अमोल जोशी, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ
आणि देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर

संपादकीय

# श्री राम

## 'शतकानंतर आज उगवली पहिली रम्य पहाट'

इ.स. २०२४ च्या प्रारंभीच मुळी आम्ही भारतीयांनी दीपावली साजरी केली. दि. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्यापुरीत श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा झाली. युगानुयुगे आसेतुहिमाचल पसरलेल्या भारतीय समाज मानसावर अधिराज्य गाजवणारे एक दैवत म्हणजे प्रभू श्रीराम. जेव्हा जेव्हा धर्मचरणाला ग्लानी येते तेव्हा तेव्हा त्याच्या अभ्युथानार्थ आणि सत्‌धर्मी सज्जनांच्या संरक्षणासाठी तसेच असत्याचा नाश करण्यासाठी आणि संपूर्ण समाजावर परिपूर्ण ज्ञानाची पखरण करण्याचे कार्य श्रीरामांनी केले.

एक आदर्श पुत्र, छात्र, पती, लोकपाल या नात्याने श्रीरामाचे चरित्र म्हणजे केवळ आदर्श. श्री वाल्मिकी रामायणात श्रीरामाची जी अनेक स्वभाव वैशिष्टये महर्षी वाल्मिकी सांगतात त्यापैकी एक असे आहे की जर समजा श्रीरामावर कोणी ९९ अपकार केले आणि १ उपकार केला तर श्रीराम त्या व्यक्तीने केलेल्या एका उपकाराचे स्मरण करुन त्या व्यक्तीशी सदैव कृतज्ञ भावाने वागत.

श्रीरामाच्या विचारसणीबद्दल एक कथा सांगितली जाते. एकदा राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न ही चारही भावंडे शरयूतिरी हिंडत असता भरताने श्रीरामाला प्रश्न विचारला की, कैकयी मातेमुळे तुला वनवास भोगावा लागला, आपल्या कुळाला एवढ्या विपदांचा सामना करावा लागला तरी, कैकयी मातेला तू दंड का दिला नाहीस ? त्यावर मंदपणे हसत श्रीराम म्हणाले होते की, हे भरता, तुझ्यासारखा चरित्रवान आणि धर्मपरायण पुत्राला ज्या मातेने जन्म दिला तिला मी कसे दंडित करु शकेन ? त्यावर भरताने प्रतिप्रश्न केला की, हे बंधो, हा तर मोह नाही का ? राजा हा मोह विमुक्त असावा तेव्हा तू राजाच्या भूमिकेतून मला सांग. त्यावर श्रीराम उत्तरार्थ म्हणाले, हे भरता, आपल्या नात्यातल्या किंवा जवळच्या कुणाही व्यक्तीला त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा न देणे हाच या सृष्टितला सर्वात कठोर दंड आहे. मातेला आपल्या या एका मोठ्या अपराधाबद्दल भरपूर दंड भोगायला लागला. आपल्या या अपराधापोटी तिला कायमसाठी आपला पती व १४ वर्षांसाठी पुत्र गमवावे लागले. स्वतःचे सुख आणि सन्मान तिला गमवावा लागला. अपराधाच्या सततच्या जाणिवेतून ती कधीच मुक्त होऊ शकली नाही. आता वनवास संपल्याने आपण सारे परिवारजन मोठ्या आनंदाने कालक्रमणा करीत आहोत, आपले जीवन उपभोगत आहोत पण आपल्या हातून घडलेल्या त्या एका कृतीने मातेला मात्र कधीच समाधान लाभले नाही. यापेक्षा अधिक मोठा दंड कुठला ? फक्त मला मात्र एका गोष्टीचे मोठे दुःख आहे की माझ्यामुळे तिला हा दंड सोसावा लागला आणि भरता मातेच्या या कृतीला अपराध तरी कसे म्हणायचे ? वनवासामुळे मला भ्रातृ प्रेम अनुभवायला मिळाले. मी पित्याच्या आज्ञेमुळे वनवास पत्करला. तुम्ही मात्र कोणाचीही आज्ञा नसताना आपणहून १४ वर्षे वनवास भोगला. माझ्या भाग्यात जर वनवास नसता तर भावा-भावांचे संबंध कसे असावेत हे जगाला कळले असते का ?

श्री रामाच्या या आचरणामुळे नीतीश्रेष्ठ, विद्याश्रेष्ठ आणि जे जे उदात्ततम आहे त्याचे रुप म्हणजे श्री रामाचे जीवन हा संकेत रुजला. श्री राम नीती 'आधी केले मग सांगितले' या पठडितली होती. श्री रामाचे आचरण 'लोका सांगे ब्रम्हज्ञान' या प्रवृत्तीचे नव्हते. प्रजा रंजन हाच श्री रामाच्या मते श्रेष्ठ धर्म होता. श्री रामांनी आपल्या वैयक्तिक अणि सार्वजनिक जीवनात सदैव सत्त्वांचे पालन केले. त्यासाठी स्वतःला झालेल्या देह कष्टाची आणि मनोयातनांची कधी फिकीर केली नाही वा त्याचा बाऊ केला नाही.

श्री रामाच्या ठिकाणी असलेल्या दया, क्षमा, शांती, मृदुता, प्रेम, उदयोग प्रियता, साहस, धैर्य, बळ, बुध्दी, पराक्रम, वीरत्व, निर्भयता, दूरदृष्टी, समय सूचकता, विनम्रता, तितिक्षा, संयम, निस्पृहता, नीतीमत्ता, समत्व, त्याग, तेज, कर्तव्य दक्षता, मर्यादा संरक्षण, एक पत्नी व्रत, सत्य, एकबाणी, एक पत्नीपणाची बाणेदार वृत्ती, देव धर्म भक्ती, मातृभक्ती, पितृभक्ती, गुरुभक्ती, इतरांप्रती आदरभाव, भ्रातृप्रेम, मित्रप्रेम, शरणागतवत्स्लता, सरलता, व्यवहार कुशलता, पावित्र्य,

वेद शास्त्रज्ञता, शील, धर्मशास्त्रज्ञता, सर्वज्ञता आदी सद्‌गुणांचा बोध करुन आपापल्या बुध्दी बळानुसार त्याचे आचरण करणे व ते अधिकाधिक उन्नतावस्थेत परिणत करण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच श्री रामाची उपासना व भक्ती.

विद्यार्थ्यांसमोर राम चरित्राचा आदर्श सातत्याने रहावा म्हणून आपल्याही संस्थेत राम मंदिराची स्थापना करण्यात आली आहे. श्री राम हा कुठलाही नारा नाही, श्री राम एक आचरण आहे, एक चरित्र आहे, एक जीवनशैली आहे म्हणूनच आपल्याकडल्या श्री रामदास स्वामींनी 'आनंदवनभुवनाची' स्थापना करण्यासाठी 'कोदंडधारी' रामाला आवाहन केले. आपल्या करुणाष्टकात श्री रामाची आळवणी करताना रामदास स्वामी म्हणतात

*'अनुदिन अनुतापे तापलो रामराया ।*
*परमदिन दयाळा नीरसी मोह माया ।*
*अचपळ मन माझे नाव रे आवरीता ।*
*तुजवीण शीण होतो धाव रे धाव आता'* ।।

आपण सर्वसामान्य प्रापंचिक माणसे, म्हणून 'बनता बनता बनेल' या न्यायाने समाजातील प्रत्येक व्यक्तीने जर प्रामाणिकपणे, यथाशक्ती श्री रामाचे गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न केला तर 'कोणाच्याही डोळयात दुःखाश्रू चा एकही थेंब नसलेला मानवतेचा भव्य प्रासाद पाहता पाहता साकार होईल' हे महात्मा गांधीचे स्वप्न प्रत्यक्षात येईल याबद्दल शंका नाही.

**दि. २६ जानेवारी २०२४**
**प्रजासत्ताक दिन**

## विघ्नसंतोषी लोकांवर वचक

मागील आठवड्यात मी एका शाळेच्या संमेलनाला गेलो होतो. रात्री करमणुकीचे कार्यक्रम चालू होते. मुलांनी, मुलींनी, शिक्षकांनी, शिक्षिकांनी मोठ्या उत्साहाने बसविलेले कार्यक्रम चालू होते. कार्यक्रमाला रंग भरत होता. पालकांना आपल्या मुलां-मुलींबद्दल, शिक्षकांना आपल्या शिष्यांबद्दल आणि गावकऱ्यांना आपल्या शाळेबद्दल कौतुक वाटत होते.

इतक्यात सर्वत्र एकदम काळोख झाला. चौकशी झाली. ओव्हरलोडचा फ्यूज नव्हता. बाहेर पाहिले. रस्त्यावरून कोणी दुष्ट माणसाने खुरप्याच्या साहाय्याने विजेच्या ताराच तोडल्या होत्या. सर्व कार्यक्रम बंद झाल्याचे जाहीर करावे लागले.

काय हा विघ्नसंतोषीपणा! चार-पाच हजार स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध, यांचा विरस झाला. मुलां-मुलींचा, शिक्षकांचा हिरमोड झाला. नागरिकांना वाईट वाटले. केवळ एक हलकट मनुष्य सर्व समाजाचे इतके नुकसान करू शकतो!

अशी विघ्नसंतोषी माणसे समाजात असतात, पूर्वी होती, आता आहेत. शिक्षणाचा व ज्ञानाचा प्रसार झाला; पण यांची संख्या कमी झाली नाही. अशा माणसांवर भोवतालच्या लोकांनीच नियंत्रण घातले पाहिजे.

याच वृत्तीची माणसे पुढे वेळ आली की, देशद्रोही बनतात. क्षुल्लक स्वार्थाकरिता देशाचे नुकसान करायला हे मागेपुढे पाहणार नाहीत. शत्रूला बातमी द्यायला हे कमी करणार नाहीत. आपल्या सैन्याचे आणि दारूगोळ्याचे कारखाने उडवून द्यायला हे कमी करणार नाहीत. समाजाला व देशाला यांच्यापासून फार भय आहे.

ही वृत्ती दिसेल तेथे ठेचून काढली पाहिजे. या लोकांच्या मनात पाप असल्याने ते भेकड असतात. दुसऱ्या माणसांनी थोडे दटावले आणि चापले की नरम येतात. नैतिक सामर्थ्य आणि धीटपणा असलेले लोक भोवताली पाहिजेतच. त्यांचा वचक या विघ्नसंतोषी लोकांवर बसू शकेल.

कोणीही समाजाचे नुकसान करताना दिसला की त्याला तेथल्या तेथे हटका; गोड शब्दांत सांगा; न ऐकल्यास जालीम उपाय योजा; पण अशा दुष्टांवर नियंत्रण ठेवणे हे तुमचे व माझे काम आहे.

**डॉ. ग. श्री. खैर (फेब्रुवारी १९५६)**



## अयोध्येमधे श्री राम लल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्याच्या निमित्ताने धनुर्धारी श्रीराम मंदिरात विविध कार्यक्रम संपन्न

अयोध्या नगरीमध्ये दि. २२ जानेवारी २०२४ रोजी आयोजित श्री राम लल्ला मूर्ती प्रतिष्ठापनेच्या निमित्ताने संपूर्ण भारतभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने संस्थेच्या धनुर्धारी श्रीराम मंदिरात रविवार दि. २१ जानेवारी २०२४ रोजी चित्रकलेतून 'राम सेतू' हा उपक्रम संस्थेच्या आश्रम वसतिगृहातील विद्यार्थी व चित्रकला मार्गदर्शिका गिरीजा कोंडे देशमुख यांचे सहकार्याने सपंन्न झाला.

सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी सकाळी श्रीराम लक्ष्मण यांच्या मूर्तीवर विधिवत अभिषेक करून पूजा नेवैद्य व आरती संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांचे शुभहस्ते सपत्नीक करण्यात आली. या प्रसंगी रामरक्षा पठण करण्यात आले. सर्व उपस्थित विद्यार्थी व रामभक्त यांना सुंठवडा व महाप्रसाद देण्यात आला.

दुपारी कथ्थक शिक्षिका कुमारी रेणुका टिकारे यांनी 'रामजन्मला गं सखे राम जन्मला' या गाण्यातून कथ्थक नृत्य सादर केले. संस्थेच्या वतीने संचालक श्री. सुनील रेडेकर यांच्या हस्ते त्यांना भेट वस्तु देऊन सन्मानित करण्यात आले.

सायंकाळी ७.०० वाजता राममंदिरात पणत्या लावून दिपोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये हिंदू अध्यात्मिक संघ, ब्राह्मण संघ व इतर संस्थांचे सहकार्य व मदत मिळाली. या कार्यक्रमासाठी संपूर्ण राममंदिर परिसर विद्युत रोषणाईने सुशोभित करण्यात आला होता. अभिनव कला भारती यांचेकडून सुंदर रांगोळी काढण्यात आली होती.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे देणगीदार, माजी विद्यार्थी, पदाधिकारी, संचालक, विविध विभागातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आश्रमीय विद्यार्थी आणि या परिसरातील नागरिक बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत हा उत्सव संपन्न झाला. विविध वर्तमानपत्रे व समाज माध्यम यांनी या कार्यक्रमास प्रसिध्दी दिली.

***

## महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### सावित्रीबाई फुले जयंती आणि बालिका दिन

दि. ३.१.२०२४ रोजी सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन उत्साहात साजारा करण्यात आला. कार्यक्रमाच्या आरंभी प्राचार्य वि. पां. गावडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. प्राचार्य वि. पां. गावडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी आभर प्रदर्शन केले.

### स्वामी विवेकानंद जयंती

शनिवार दि. ६ जानेवारी २०२४ रोजी स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सदस्य श्री. अहमद शेख यांचा परिचय अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी करुन दिला. श्री. अहमद शेख यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. श्री. अहमद शेख यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर, जीवनावर आधारित असलेली प्रश्नावली विद्यार्थ्यांना देऊन त्याची उत्तरे विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतली. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदस्या प्राची गिरासे यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सदस्य श्री. श्रीकार बिराजदार यांनी केले.

### ७५ वा प्रजासत्ताक दिन

शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४ रोजी ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत राज्यगीत सादर करण्यात आले. महाराष्ट्र विद्यालयाच्या एन.सी.सी. छात्रांनी आणि मुक्तांगण इंग्लिश स्कूल, सदाशिव पेठ शाखेच्या स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांनी मार्च पास्ट करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी विद्यार्थी, सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक यांच्याकडून ध्वजप्रतिज्ञा म्हणवून घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुक्तांगण इंग्लिश स्कूल, सदाशिव पेठ शाखेच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी केले. अध्यापिका सौ. भारती पऱ्हाड यांनी संविधान वाचन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी करून दिला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तु देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संचालक श्री. रमेश कुलकर्णी व डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य वि. पां. गावडे, एम. आय. पी. टी.चे प्राचार्य पी. व्ही. शिंदे, शिशुनिकेतनच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांचा सत्कार मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन केला. विद्यार्थी चि. अमेय फडके इ. १२ वी या विद्यार्थ्याची एनडीए मध्ये निवड झाल्याबद्दल आणि एम. आय. पी. टी. चा विद्यार्थी चि. वेद बच्छाव या विद्यार्थ्यास नॅशनल स्टुडंट ऑफ द इयर अ‍ॅवार्ड मिळाल्याबद्दल कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पिरॅमिड तसेच इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. मुक्तांगण इंग्शिल स्कुल सदाशिव पेठ शाखेच्या विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तांगण इंग्शिल स्कुलच्या सदाशिव पेठ शाखेच्या अध्यापिका सौ. स्वरूपा मोरे व सौ. सोनाली शिंदे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन अध्यापिका सौ. अश्विनी धांदल यांनी केले. सुंदर फलक लेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेच्या विविध विभागातील सेवक, शिक्षक- शिक्षकेतर सेवक, माजी विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम या गीताने करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### अभ्यासाचे टेक्निक कार्यक्रमाचे आयोजन

शनिवार दि. २०.१.२०२४ रोजी जीवन विद्या मिशनच्याद्वारे ‘अभ्यासाचे टेक्निक’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते व्याख्याते श्री. चंद्रकांत निंबाळकर यांचा शताब्दी स्मरणिका देऊन सत्कार करण्यात आला. श्री. चंद्राकांत निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर

सेवक उपस्थित होते. आभारप्रदर्शन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले.

**स्नेहसंमेलन**

शुक्रवार दि. १६ ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत स्नेहसंमेलनानिमित्त क्रिडास्पर्धा आणि बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक यांना भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शुक्रवार दि. १२ जानेवारी २०२४ रोजी टिळक स्मारक मंदिर येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अभय एम. हरसुलकर, विभाग प्रमुख, पुना कॉलेज ऑफ फार्मसी (फार्मास्युटिकल बायोटेक्नॉलॉजी भारती अभिमत विद्यापीठ) हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे डॉ. अभय एम. हरसुलकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यानंतर डॉ. अभय एम. हरसुलकर, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि श्री. रमेश कुलकर्णी, प्राचार्य वि. पां. गावडे, शिक्षक प्रतिनिधी सौ. कीर्ती राठोड आणि श्रीमती वैशाली मोघे या सर्वांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर ईशस्तवन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. अध्यापिका सौ. रुपाली चौथाई यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते डॉ. अभय एम. हरसुलकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि श्री. रमेश कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी सौ. कीर्ती राठोड आणि श्रीमती वैशाली मोघे यांचा सत्कार प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. डॉ. अभय एम. हरसुलकर यांच्या हस्ते आश्रमस्थ विद्यार्थी चि. जयदीप भगवान सवासे यास अष्टपैलू विद्यार्थी म्हणून 'भागवत ढाल', पुष्पगुच्छ, पुस्तक देऊन गौरविण्यात आले. क्रीडा स्पर्धा व बौध्दिक स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुस्तक देऊन गौरविण्यात आले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे व सौ. कीर्ती राठोड यांनी अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुणे डॉ. अभय एम. हरसुलकर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यापिका सौ. सुनंदा भाईक व सौ. अपर्णा भरगुडे यांनी यादीवाचन केले. अध्यापिका सौ. वैशाली पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर इ. ५ वी ते इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ❊

**❊ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० ❊**



डॉ. अभय एम. हरसुलकर यांच्या हस्ते 'भागवत ढाल' स्विकारताना आश्रमस्थ अष्टपैलू विद्यार्थी चि. जयदीप सवासे, समवेत डावीकडून संचालक श्री. रमेश कुलकर्णी, प्राचार्य वि. पां. गावडे आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### गणित दिवस

दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंद यांनी गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचे प्रतिमा पूजन करून अभिवादन केले.

शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी श्रीनिवास रामानुजन यांचे गणितीय कार्याविषयी माहिती सांगितली. विद्यार्थी चि. हर्षद ठेपणे इयत्ता आठवी याने रामानुजन यांचा गणिताचा ध्यास याविषयी माहिती सांगितली. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी व्यवहारी जीवनातील गणिताचे महत्त्व याविषयावर एक नाटिका सादर करून उदबोधन केले. चि. संजय चौधरी आणि चि. युवराज खांडवी इयत्ता दहावी या विद्यार्थ्यांनी गणितातील ट्रिक्स, वैदिक गुणाकार, सलग १० संख्याची बेरीज इत्यादी विषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी जीवनातील गणित विषयाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गौरव झुरडे यांनी केले. श्रीमती केकाण अर्चना यांनी आभार मानले .

### मार्गदर्शनपर व्याख्यान

दि. २३ डिसेंबर २०२३ रोजी के. के. वाघ पॉलिटेकनिक महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. धारणे आणि सौ. टर्ले यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी दहावी नंतर काय करावे? कोणते क्षेत्र निवडावे ? याविषयी मार्गदर्शन केले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी आभार मानले .

### श्री दत्त जयंती

दि. २८ डिसेंबर २३ रोजी श्री दत्त जयंती विद्यालयात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी श्री दत्त प्रतिमेचे पूजन केले. सौ. तेजश्री जोशी यांनी श्री. दत्तजन्माची कथा सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. तुकाराम मंडले यांनी केले. सौ.अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले .

### वार्षिक क्रिडा स्पर्धा

दि. २९ ते ३१ डिसेंबर २०२३ रोजी विद्यालयात वार्षिक क्रिडा महोत्सव संपन्न झाला. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन केले. विद्यार्थ्यांना जीवनातील खेळाचे महत्त्व सांगितले. श्री. तुकाराम मंडले यांनी विद्यार्थ्यांना क्रिडा शपथ दिली. क्रिडा महोत्सवात विविध सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले. क्रिडा महोत्सवात विविध स्पर्धांत यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे

**स्मरणशक्ती स्पर्धा - इ. ५ वी / ६वी गट**

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. मोहित नितीन गवळी | ५वी |
| द्वितीय | कु. विजय प्रभाकर गवळी | ६वी |
| तृतीय | कु. मयुर मुरलीधर निकम | ६वी |

**चमचा लिंबू स्पर्धा - इ. ५ वी गट**

| | |
|---|---|
| प्रथम | कु. शुभम सुदाम खांडव |
| द्वितीय | कु. समीर भगवान पवार |
| तृतीय | कु. प्रणव कैलास भोये |

**चमचा लिंबू - इ. ६ वी गट**

| | |
|---|---|
| प्रथम | कु. राहुल होनाजी खंबाइत |
| द्वितीय | कु. कुणाल रामजी राथड |
| तृतीय | कु. यश निवृत्ती शेलार |

**पोत्यांची शर्यत - इ. ७ वी गट**

प्रथम कु. साहिल प्रवीण जोपळे
द्वितीय कु. विशाल सुनील राउत
तृतीय कु. योगेश परसराम जोपळे

**पोत्यांची शर्यत - इ. ८वी गट**

प्रथम कु. समीर तुळशीराम राउत
द्वितीय कु. सुधाकर किसन पवार
तृतीय कु. तुषार योगेश मानभाव

**पोटॅटो रेस - इ. ९वी गट**

प्रथम कु. ओमकार सुधाकर गवळी
द्वितीय कु. दर्शन सुनील जमदाडे
तृतीय कु. देवेंद्र विकास गायकवाड

**पोटॅटो रेस - इ. १०वी गट**

प्रथम कु. भगवान हरिश्चंद्र वाघेरे
द्वितीय कु. आदित्य हेमंत महाले
तृतीय कु. जीवन गजानन वाघेरे

**संगीत खुर्ची - इ. ९वी गट**

प्रथम कु. शुभम विलास खांडवी
द्वितीय कु. करण मोतीराम खोटरे
तृतीय कु. पवन संदीप जाधव

**संगीत खुर्ची - इ. १० वी गट**

प्रथम कु. शाम मानभाव .
द्वितीय कु. संजय आनंदा चौधरी.
तृतीय कु. हर्षद रामदास पोटींदे.

**गोळा फेक - इ. ८वी गट**

प्रथम कु. हर्षद केशव गवळी
द्वितीय कु. समीर तुळशीदास राउत

**गोळा फेक - इ. ९ वी गट**

प्रथम कु. योगेश जगन मोरे.
द्वितीय कु. देवेंद्र विकास गायकवाड

**गोळा फेक - इ. १०वी**

प्रथम कु. सोपान मुरलीधर बेंडकोळी
द्वितीय कु. अंकुश रामचंद्र लहामगे .

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!**

**सावित्रीबाई फुले जयंती**

दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी विद्यालयात सावितीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सावित्री बाई फुले यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक कार्याविषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सावित्रीबाई यांचे जीवनातील विविध प्रसंग कथन केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले. या प्रसंगी मुख्याध्यापक सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**स्वामी विवेकानंद जयंती**

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख अतिथी सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शिवाजी माळी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृदांनी स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शिक्षिका श्रीमती अर्चना केकाण यांनी स्वामी विवेकानंदाचे बालपण, शिक्षण आणि सामाजिक कार्याविषयी माहिती सांगितली. प्रमुख अतिथी श्री. माळी यांनी स्वामी विवेकानंद यांचा शिकागो येथील सर्वधर्म परिषदेतील प्रसंग कथन केला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वामी विवेकानंद यांचे देशकार्याविषयी माहिती सांगितली. सौ. तेजश्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले .

**विज्ञान मेळावा**

दि. १६ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. संचालक श्री. अमोल जोशी यांचे हस्ते फित कापून विज्ञान मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी संचालक श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सन्मान केला. विज्ञान मेळाव्यात इंधनबचत, उर्जाबचत, साधी यंत्रे, पवन उर्जा, सौरऊर्जेवर आधारित उपकरणांचे

सादरीकरण केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी सर्व उपक्रमांचे निरीक्षण करून विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, कार्यवाही विज्ञान शिक्षक श्री. गौरव झुरडे, सौ. अस्मिता बावधनकर आणि श्रीमती अर्चना केकाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकाण यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

### बालिका दिन

दि. ३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून साजरी करण्यात येते. शिक्षिका सौ. निशिगंधा सोमवंशी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प हार घालून त्यांच्या कार्याची माहिती सांगितली. विद्यार्थिनी कु. समृद्धी मोराडे इ. ६ वी हिने सावित्रीबाईंच्या कार्यावर माहिती सांगितली. कु.किर्ती कुमावत इ ४ थी या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर कविता सादर केली.

### आदर्श शिक्षिका पुरस्कार

ढिकले स्पोर्ट्स व दुधारे स्पोर्ट्स फौंडेशन तर्फे सावित्रीबाई फुले जयंती निमित्त 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' प्रदान करण्यात आले. शिक्षिका सौ. सोनाली जोशी व सौ. माधुरी गवळी या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.



**'आदर्श शिक्षिका पुरस्कार' प्राप्त शिक्षिका सौ. सोनाली जोशी व सौ. माधुरी गवळी**

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा

दि. ३ जानेवारी रोजी शासनाचा मुख्यमंत्री ''माझी शाळा सुंदर शाळा'' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री यांचे पत्र वाटप करण्यात आले. इ ६ वी आणि ७ वी च्या विद्यार्थ्यांनी नाटकाचे सादरीकरण करून स्वच्छतेचे महत्त्व व कचऱ्याचे निरसन कसे करावे हे दाखविले. या नाटकासाठी शिक्षिका सौ शुभांगी देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

### पक्षी दिन

दि. ५ जानेवारी २०२४ रोजी पक्षीदिन साजरा करण्यात आला. शाळेच्या शिक्षिका कु आरती ठाकरे यांनी पक्षी संवर्धन माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### इंग्लिश मॅरेथॉन

इ. १ ली ते इ ७ वी च्या विद्यार्थ्यांची इंग्लिश मॅरेथॉन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल ६ जानेवारी २०२४ रोजी जाहीर झाला.या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले. या परीक्षेला एकूण २५६ विद्यार्थी बसले होते. त्यातील ८ विद्यार्थी प्रथम क्रमांक, १२ विद्यार्थी द्वितीय क्रमांक, ११ विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे. २० विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र मिळाले आहे. विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे:-

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ ली | कु. स्वयंम स्वप्नील जाधव | प्रथम |
| | कु. स्वरूप अनिल भामरे | द्वितीय |
| | कु. दिव्यांशु जगन्नाथ गायकवाड | तृतीय |
| २ री | कु. रेश्मा राजेश थेटे | प्रथम |
| | कु. हिमांशु हेमंतकुमार राउत | द्वितीय |
| | कु. नील राकेश मोरे | द्वितीय |
| | कु. सीया विजय साळवे | द्वितीय |
| | कु. विभाली भिकान देशमुख | तृतीय |

| | | |
|---|---|---|
| इ ३ री | कु. स्वराज नितीन भोसले | प्रथम |
| | कु. शिवानी विनोद चव्हाण | द्वितीय |
| | कु. ओजस्वी राजेंद्र घडवजे | द्वितीय |
| | कु. कृष्णा शिवदास झनन | तृतीय |
| ४ थी | कु. ईश्वरी अशोक गांगुर्डे | प्रथम |
| | कु. नर्मल संतान जगताप | द्वितीय |
| | कु. रेयांश गणेश पवार | द्वितीय |
| | कु. पूर्वा संदीप पवार | तृतीय |
| | कु. योग नारायण धोंडगे | तृतीय |
| ५ वी | कु. दुर्वांकुर विनोद कोळंबे | प्रथम |
| | कु. श्रेयस किरण भिरूड | द्वितीय |
| | कु. सक्षम विष्णू महाले | द्वितीय |
| | कु. वेदांत सतीश रहाणे | तृतीय |
| | कु. स्वर राकेश धांडे | तृतीय |
| ६ वी | कु. आशुतोष सत्यशील दुबल | प्रथम |
| | कु. सर्वज्ञ संदीप शिराळ | द्वितीय |
| | कु. अर्णव गौतम माहुरे | तृतीय |
| ७ वी | कु. सुरभी सुनील बर्डे | प्रथम |
| | कु. प्रीती महेश चौहान | प्रथम |
| | कु. प्राची विजय चिमणकारे | द्वितीय |
| | कु. प्रथमेश महेश बोटवे | तृतीय |
| | कु. आरोही नीरज देशपांडे | तृतीय |
| | कु. आर्या विजय बाविस्कर | तृतीय |

**उपक्रम**

२७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवानिमित्त राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत ११ जानेवारी २०२४ रोजी इ ६ वी आणि ७ वी च्या विद्यार्थ्यांनी रांगोळी काढली.

**स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाबाई जयंती**

दि. १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंती व युवा दिन साजरा करण्यात आला. तसेच राजमाता जिजाबाई यांची जयंती देखील साजरी करण्यात आली. शाळेच्या शिक्षिका सौ योगिता कोठावदे यांनी विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांच्या कार्याची माहिती दिली. तसेच सौ रेखा जंजाळ यांनी राजमाता जिजाबाई यांची माहिती सांगितली

**नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ**

दि. १३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना पतंग उडविताना नायलॉन मांजाचा वापर करणार नाही. मी सुती मांजा वापरून पतंग उडवून संक्रांत सण साजरा करेल. मी पर्यावरणातील प्राणी पक्षी यांना इजा होणार नाही, तसेच रस्त्यातील दोन चाकी वाहन चालकांना नायलॉन मांजा न वापरून त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेईन.अशी शपथ घेण्यात आली. ***

## पुणे विद्यार्थी गृहाची नवीन कार्यकारिणी जाहिर

समाचार माहे जानेवारी २०२४ पृष्ठ क्र. ५ चुक दुरुस्ती



**श्री. एस. एम. जिर्गे, उपकार्याध्यक्ष**

श्री. एस. एम. जिर्गे हे संस्थेचे माजी विद्यार्थी, देणगीदार व अनुभवी सेवक असून दि. १७.११.२०११ पासून ते संस्थेचे आजीव सभासद म्हणून कार्यरत आहेत. सध्या संस्थेच्या आर. के. खाडिलकर मुलींचे वसतिगृह, डॉ. प्र. र. जोशी संगणक केंद्र, मुक्तांगण बालरंजन केंद्र व स्थावर आणि बांधकाम या विभागांचे संचालक म्हणून दैनंदिन कामकाज पाहात आहेत. दि. १.७.२०२१ पासून ते संस्थेचे उपकार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळलेली आहे. श्री. एस. एम. जिर्गे यांची दि. १.१.२०२४ ते दि. ३१.१२.२०२४ या कालावधीसाठी उपकार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. ***

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

# पुणे विद्यार्थी गृहाची मुंबई शाखा विद्याभवन – घाटकोपर

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई शाखा

### कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृति आंतर विद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२३-२४

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृति आंतर विद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा शनिवार दि. ९.१२.२०२३ रोजी विद्याभवन घाटकोपर येथे घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ७ शाळा सहभागी झाल्या होत्या. एकूण सहभागी २२ स्पर्धक होते. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. सुभाष म्हात्रे व सौ. श्रुती पांढारकर लाभले होते.

या स्पर्धेतील विजयी विद्यार्थी खालीलप्रमाणे :

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| प्रथम | कु. माने स्नेहल अरूण | विद्याभवन, घाटकोपर |
| द्वितीय | कु. शेळके अनघा अभय | विद्याभवन, नेरुळ |
| तृतीय | कु. मोरे वेदांत नामदेव | विद्याभवन घाटकोपर |

या स्पर्धेचा 'उत्कृष्ट विद्यालय' चषक विद्याभवन हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाळेने मिळविला.

### कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृति आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२३-२४

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृति आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा शनिवार दि. १६.१२.२०२३ रोजी विद्याभवन घाटकोपर येथे घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ३ महाविद्यालय सहभागी झाले होते. एकूण स्पर्धक संख्या ८ होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. जगन्नाथ ठाकूर (मराठी विषय शिक्षक) ज्ञानप्रकाश विद्यालय, घाटकोपर व श्रीमती अपर्णा वाघरे (मराठी विषय प्राध्यापक) बांदोडकर कॉलेज, ठाणे लाभले होते.

या स्पर्धेतील विजयी विद्यार्थी खालीलप्रमाणे :

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| प्रथम | कु. आहेर दिक्षा बापू | विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ |
| द्वितीय | कु. भोईर श्रावणी रविंद्र | ----''---- |

या स्पर्धेचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' चषक विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ यांनी मिळविला.

### कुलगुरु दादासाहेब केतकर आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा मंगळवार दि. १९.१२.२०२३ रोजी विद्याभवन संकुलातील अप्पासाहेब गरगटे सभागृहात पार पडल्या. सदर स्पर्धेचे उद्घाटन श्री. मुश्ताक शेख, शिक्षणाधिकारी, उत्तर विभाग मुंबई यांनी केले. कुलगुरु दादांच्या प्रतिमेला श्री. मुश्ताक शेख व संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी पुष्पहार अर्पण केला. सदर कार्यक्रमासाठी मराठी व इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील तसेच समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण ३२ शाळांमधील १३५ विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, तसेच श्रीमती योगिनी पोतदार व श्री. सुनील पाटील यांनी ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**कै. मारुती लक्ष्मण मराठे आंतरशालेय बुध्दिबळ स्पर्धा**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे आयोजित कै. मारुती लक्ष्मण मराठे आंतरशालेय बुध्दिबळ स्पार्धा बुधवार दि. २०.१२.२०२३ रोजी विद्याभवन संकुलातील अप्पासाहेब गरगटे सभागृहात पार पडल्या. सदर स्पर्धेचे उद्‌घाटन विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. मारुती लक्ष्मण मराठे यांच्या प्रतिमेला श्रीमती सरला नरेंद्रन यांनी पुष्पहार अर्पण केला. या स्पर्धेत एकूण ४५ शाळांमधील १६२ विद्यार्थी सहभागी झाले होते. विजेत्या स्पर्धकांना संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, विद्याभवन हायस्कूल नं. २ चे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर व सहा.शिक्षिका श्रीमती अस्मिता चौधरी यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**वार्षिक सहल २०२३-२४**

या वर्षाची वार्षिक सहल टिकुजीनी वाडी, ठाणे आणि सुरज वॉटर पार्क, ठाणे येथे नेण्यात आली. या सहलीसाठी सर्व विभागाचे वेगवेगळया दिवशी नियोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्षातील एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे शालेय सहल! ही सहल अतिशय आनंदात पार पडली. विविध प्रकारचे खेळ आणि मनोरंजन यातून विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला. सुग्रास जेवण आणि विविध प्रकारच्या राईड्स यामध्ये मुले अगदी हरकून गेली होती. सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून या सहलीची मजा लुटली. खालील प्रमाणे सहली नेण्यात आल्या -

प्राथमिक इंग्रजी या विभागाची सहल दि. १० जानेवारी २०२४ रोजी नेण्यात आली होती. एकूण ४३३ विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्राथमिक मराठी या विभागाची सहल दि. ९ जानेवारी २०२४ रोजी नेण्यात आली होती. एकूण २२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय या विभागांची सहल दि. २० डिसेंबर २०२३ रोजी सुरज वॉटर पार्क, ठाणे येथे नेण्यात आली. माध्यमिक मराठीचे एकूण ४५८ विद्यार्थी सहभागी झाले होते तसेच कनिष्ठ महाविद्यालय (कॉमर्स) चे एकूण ६१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

माध्यमिक इंग्रजी या विभागाची सहल दि. १४.१२.२०२३ व दि. १८.१२.२०२३ रोजी सुरज वॉटर पार्क, ठाणे येथे नेण्यात आली. एकूण ८१९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभाग,

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी), पुजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**नाताळ साजरा**

नाताळ सणाच्या वातावरणाने सर्व मुले सुंदर सजवलेल्या वर्गात उत्सुकतेने एकत्र जमली होती. अत्यंत आनंदी उत्साही आणि हसतमुख अशा वागण्याने आणि सांताक्लॉजच्या आश्चर्यचकित करणाऱ्या प्रवेशाने सर्व मुलांच्या आनंदाला आणि उत्साहाला उधाण आले. लाल-लाल पोषाख केलेल्या सांताक्लॉज च्या गंमतीदार हालचालींनी सर्वांना खूपच आनंद झाला. सांताक्लॉजने वाटलेल्या छोटया-छोटया भेट वस्तूंमुळे सर्व छोटया विद्यार्थ्यांना हा नाताळचा सण एक जादुई अनुभव देऊन गेला. सांताने सर्वांना केक दिला.

**मकर संक्रांती**

मकर संक्रांतीच्या निमित्ताने शिक्षकांनी शाळेच्या भिंती रंगीत पतंगांनी सजवल्यामुळे या सणाच्या रंगतदार उत्सवाचा प्रत्यय ठायी-ठायी येत होता. हवेत भरून राहिलेल्या या उत्सवी वातावरणामुळे सगळी छोटी मुले आनंदाने व उत्साहाने थक्क होत होती.

प्रसंगाचे औचित्य साधून सर्व शिक्षकांनी मुलांबरोबर 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला', 'पोंगलच्या खूप खूप शुभेच्छा' अशा घोषणा मोठया आनंदाने दिल्या. वातावरणाला सळसळता उत्साह मुलांना एक आनंददायी अनुभवाची शिकवण देऊन गेला आणि मकर संक्रांतीच्या सणाचे समृध्द असे सांस्कृतिक महत्त्व त्यांना शिकता आले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### विविध स्पर्धा परीक्षा

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करावी हा मूलमंत्र हाती घेऊन विद्यार्थ्यांना देखील विविध परीक्षांना बसविण्यात आले. इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र टॅलेंट सर्च म्हणजेच एमटीएस या परीक्षेला देखील विद्यार्थी कसोशीने प्रयत्न करत आहेत. ओलंपियाड आणि नेल्टसच्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

### हस्ताक्षर स्पर्धा

सुंदर हस्ताक्षर हाच खरा दागिना होय आणि याचे महत्व वायु टीमने इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांना सुलेख हस्ताक्षरण स्पर्धेतून पुन्हा एकदा दाखवून दिले सुंदर, सुबक, वळणदार अक्षर हे नेहमीच मनाला मंत्रमुग्ध करणारे असते आणि विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकणारे असते. दि. ३१ जुलै २०२३ रोजी ही स्पर्धा घेतली गेली यामध्ये देखील इयत्ता १ली ते ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवत आपले अक्षर अजून कसे सुंदर करता येईल याचा निश्चय केला.

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. आराध्या तांबोळी | प्रथम |
| | कु. अनन्या पडवळ | द्वितीय |
| | कु. अनय कुंभारे | तृतीय |
| | कु. सांगवी बच्चे | उत्तेजनार्थ |
| | कु. मनस्वी पटेल | उत्तेजनार्थ |
| | कु. आर्मी मोरे | उत्तेजनार्थ |
| २ री | कु. सात्विक गायकर | प्रथम |
| | कु. आदेश उपरकर | द्वितीय |
| | कु. आराध्या गाडगे | तृतीय |
| | कु. मयुरेश पाटेकर | उत्तेजनार्थ |
| | कु. सान्वी मोहिते | उत्तेजनार्थ |
| | कु. देवांश गायकवाड | उत्तेजनार्थ |
| ३री | कु. हर्षवर्धिनी किरण पडवळ | प्रथम |
| | कु. मैथिली दिनेश सावंत | द्वितीय |
| | कु. स्वरा तेजस पावस्कर | तृतीय |
| | कु. सिध्दी समीर महाडिक | उत्तेजनार्थ |
| | कु. हिंदवी संतोष सूर्यवंशी | उत्तेजनार्थ |
| | कु. अन्वी राजपुरे | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. दुर्वेश रासकर | प्रथम |
| | कु. प्रभा तमिलागन नाडार | द्वितीय |
| | कु. राजेश्वरी सानप | तृतीय |
| | कु. श्री भिसे | उत्तेजनार्थ |
| | कु. निव्या राणे | उत्तेजनार्थ |
| | कु. विधी बगाडी | उत्तेजनार्थ |

### कथाकथन स्पर्धा

पृथ्वी हाऊस आयोजित इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. इ. १ली आणि २री साठी तात्पर्य आणि गोष्ट तसेच इ. ३री ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी शौर्य कथा असे विषय देण्यात आले होते. दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी या विषयाच्या अनुषंगाने विविध कथांचा अभ्यास केला. विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. इझान रशीद सय्यद | प्रथम |
| | कु. मनवा जयेश पाडेकर | द्वितीय |
| | कु. सौम्या सुनील अपराज | तृतीय |
| | कु. अद्विक वैभव जाधव | उत्तेजनार्थ |

| | | |
|---|---|---|
| | कु. ध्विजा जनार्दन झाजम | उत्तेजनार्थ |
| | कु. विघ्नेश विनोद पवार | उत्तेजनार्थ |
| २री | कु. कैरवी कमलेश मोरे | प्रथम |
| | कु. वंशिका संजय जाधव | द्वितीय |
| | कु. मुक्ता शशिकांत मिंडे | तृतीय |
| | कु. आराध्या अशोक गुंजाळ | तृतीय |
| | कु. सात्वी चंद्रकांत गायकर | उत्तेजनार्थ |
| | कु. पूर्वी मंगेश कनगुटकर | उत्तेजनार्थ |
| ३री | कु. स्वरा नितीन केंजाळे | प्रथम |
| | कु. स्वरूपा गणेश कणसे | द्वितीय |
| | कु. हर्षवर्धिनी किरण पडवळ | तृतीय |
| | कु. तेजश्री देविदास डेरे | उत्तेजनार्थ |
| | कु. ग्रिष्मा योगेश हांडे | उत्तेजनार्थ |
| | कु. अनिश पंकज वाघ | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. शौर्य गणेश गायकर | प्रथम |
| | कु. सृष्टी दयानंद सुतार | द्वितीय |
| | कु. निव्या राजेश राणे | तृतीय |
| | कु. दर्शील महेश कीर्ती | तृतीय |
| | कु. श्रावस्थी अविनाश जाधव | उत्तेजनार्थ |
| | कु. सई नरेश मते | उत्तेजनार्थ |
| | कु. आयान हतीन शेख | उत्तेजनार्थ |

### मेमरी टेस्ट कॉम्पिटिशन

विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वृध्दिंगत व्हावी हा मुद्दा मनात ठेवून जल हाऊस आयोजित मेमरी टेस्ट कॉम्पिटिशन दि. २८ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला त्यापैकी बक्षीस पात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. दिया शिल्पन व्यास | प्रथम |
| | कु. आराध्या परेश कदम | द्वितीय |
| | कु. ध्रुविका अनिल मोरे | तृतीय |
| | कु. मनवा जयेश पाडेकर | उत्तेजनार्थ |
| | कु. आराध्या राकेश सावंत | उत्तेजनार्थ |
| | कु. विहा विश्वास गाडे | उत्तेजनार्थ |
| २री | कु. वेदांत नितीन काळभोर | प्रथम |
| | कु. सार्थक प्रशांत नार्वेकर | द्वितीय |
| | कु. सेजल गणेश पवार | तृतीय |
| | कु. साक्षी संदीप ठोंबरे | उत्तेजनार्थ |
| | कु. तक्षवी प्रकाश जानकर | उत्तेजनार्थ |
| | कु. पूर्वी मंगेश कनगुटकर | उत्तेजनार्थ |
| ३री | कु. मृणमयी गिरीश सावंत | प्रथम |
| | कु. श्रावणी सुहास काशिद | द्वितीय |
| | कु. जय गणेश लांडे | तृतीय |
| | कु. अभिनव जालिंदर वंडेकर | उत्तेजनार्थ |
| | कु. सार्थक महेश शिंदे | उत्तेजनार्थ |
| | कु. अनन्या किशोर अमृतकर | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. प्रभा तमिलागन नडार | प्रथम |
| | कु. मनस्वी विनायक बोरचटे | द्वितीय |
| | कु. अर्णव शंकर दाते | तृतीय |
| | कु. वरदराज विकास पाटील | उत्तेजनार्थ |
| | कु. विघ्नेश नारायण हिंदळेकर | उत्तेजनार्थ |
| | कु. अर्णव अनिकेत विखारे | उत्तेजनार्थ |

### वेशभूषा स्पर्धा

अग्नी हाऊस आयोजित वेशभूषा स्पर्धा इयत्ता पहिली व दुसरीसाठी दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवनच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली होती. इ. १ली साठी 'जलीय जीवन' तर इ. २री साठी 'हवेतील नवं जीवन' असे विषय देण्यात आले होते. बऱ्याच विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला व स्वतःला सिध्द करण्याचा प्रयत्न केला.

अग्नी हाऊस आयोजित वेशभूषा स्पर्धा इ. ३री व ४थीसाठी आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक क्षणांची आठवण देत वेशभूषा केलेली होती आणि आपापली कला सादर केली. शिवाजी महाराज, भगत सिंग, झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, तानाजी मालुसरे, मासाहेब जिजाऊ अशी विविध पात्रे विद्यार्थ्यांनी सादर केली. या कामी परीक्षक म्हणून श्रीमती चंदा भटकर व श्रीमती स्वप्ना गायकवाड यांनी काम पाहिले सूत्रसंचालनाचे प्रभावी काम आदरणीय श्री. समीर शिरकांडे यांनी केले.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवताना मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना शाबासकी देतानाच सावित्रीबाई फुले, शिवाजी महाराज, झाशीची राणी यांचे विचार आपल्या वैयक्तिक जीवनात आणण्याचा मौलिक सल्ला याप्रसंगी दिला. विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. सौम्या सुनिल अपराज | प्रथम |
| | कु. अर्फत जामील शेख | द्वितीय |
| | कु. मनवा पाडेकर | तृतीय |
| | कु. इजान सय्यद धांद्री | तृतीय |
| | कु. मिहिका क्षिरसागर खिल्लारे | तृतीय |
| | कु. आराध्या योगेश तांबोळी | उत्तेजनार्थ |
| | कु. शरयु शशिकांत पोखरकर | उत्तेजनार्थ |
| २री | कु. आलोक सुबोध मंचेकर | प्रथम |
| | कु. पूर्वी दिपक तोंडवलकर | द्वितीय |
| | कु. विराज नितीन वाघ | तृतीय |
| | कु. सात्विक चंद्रकांत गायकर | उत्तेजनार्थ |
| | कु. पूर्वी मंगेश कनगुटकर | उत्तेजनार्थ |
| | कु. रियांश संतोष वाडकर | उत्तेजनार्थ |
| ३री | कु. स्वरा नितीन केंजाळे | प्रथम |
| | कु. स्वरुपा गणेश कणसे | द्वितीय |
| | कु. रिया रुपेश कोंडुस्कर | तृतीय |
| | कु. कुमार अनिश वाघ | उत्तेजनार्थ |
| | कु. कुशल तेजस अखाडे | उत्तेजनार्थ |
| | कु. अर्णव वैभव बढे | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. शर्वरी काळे | प्रथम |
| | कु. भक्ती सरगर | द्वितीय |
| | कु. शौर्य गणेश गायकर | तृतीय |
| | कु. अनुश्री मोहिते | उत्तेजनार्थ |
| | कु. दुर्वा शिरोळे | उत्तेजनार्थ |
| | कु. श्री भिसे | उत्तेजनार्थ |

### पहा आणि सांगा स्पर्धा

विद्यार्थ्यांचे निरीक्षण तसेच आकलन आणि स्मरणशक्ती वाढावी यासाठी 'पहा आणि सांगा'ही एक अनोखी स्पर्धा अग्नी हाऊसच्या माध्यमातून इयत्ता १ली ते २री च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ८ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये इयत्ता १ली तील विद्यार्थ्यांना स्वयंपाक घरातील एखादी वस्तू दाखवण्यात आली आणि त्याच्याबद्दल त्यांना वर्णन करण्यास सांगण्यात आले. इयत्ता २री तील विद्यार्थ्यांना आनंद देणारी एखादी गोष्ट याविषयी बोलण्यास उद्युक्त करण्यात आले. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| १ली | कु. मनवा जयेश पाडेकर | प्रथम |
| | कु. सौम्या सुनील अपराज | द्वितीय |
| | कु. अद्विक वैभव जाधव | तृतीय |
| | कु. सामवेद साईप्रसाद लाड | तृतीय |
| २री | कु. पृथ्वी दीपक तोंडवळकर | प्रथम |
| | कु. अलोक सुबोध मंचेकर | द्वितीय |
| | कु. सात्विक चंद्रकांत गायकर | तृतीय |
| | कु. साक्षी संदीप हुंबरे | तृतीय |

### महापौर चित्रकला स्पर्धा

रविवार दि. १४ जानेवारी २०२४ रोजी महापौर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला आणि विषय अनुरुप चित्रे काढली. या कामी श्रीमती कविता पुजारी व श्रीमती रेश्मा पैलकर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### वाचन स्पर्धा

विद्यार्थ्यांनी नवनवीन विषयांवर नेहमी वाचत राहावे यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सांवत यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही वाचण्याची स्पर्धा इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी पृथ्वी हाऊस कडून आयोजित करण्यात आली होती. इंग्रजी पाठ्यपुस्तकातील काही परिच्छेद विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी देण्यात आले होते. आवाजातील चढउतार, इंग्रजीतील अस्सलखित उच्चार, भाषेवरील प्रभुत्व या सर्व बाबींचा या स्पर्धेमध्ये विचार करण्यात

आला होता. विद्यार्थ्यांनी अतिशय कुतूहलाने या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला व आपली विजय परंपरा कायम राखली. यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

| **इयत्ता** | **विद्यार्थ्यांची नावे** | **क्रमांक** |
|---|---|---|
| १ली | कु. मनवा जयेश कदम | प्रथम |
| | कु. आराध्या परेश कदम | द्वितीय |
| | कु. गोपाल गिरीशकुमार पांडे | तृतीय |
| | कु. मनस्वी विकास पटेल | उत्तेजनार्थ |
| | कु. अथर्व मंगेश राजेशिर्के | उत्तेजनार्थ |
| | कु. सामवेद साईप्रसाद लाड | उत्तेजनार्थ |
| २री | कु. पूर्वी मंगेश कनगुटकर | प्रथम |
| | कु. कैवल्य सुबोध मंचेकर | द्वितीय |
| | कु. भैरवी कमलेश मोरे | तृतीय |
| | कु. आलोक सुबोध मंचेकर | तृतीय |
| | कु. आस्था संतोष पांडे | उत्तेजनार्थ |
| | कु. सात्विक चंद्रकांत गायकर | उत्तेजनार्थ |
| | कु. आराध्या संतोष गाडगे | उत्तेजनार्थ |
| ३री | कु. अत्रेय समीर देवधर | प्रथम |
| | कु. मृण्मयी गिरीश सावंत | द्वितीय |
| | कु. अनिश पंकज वाघ | तृतीय |
| | कु. अभिनव जालिंदर वांडेकर | उत्तेजनार्थ |
| | कु. अनन्या किशोर अमृतकर | उत्तेजनार्थ |
| | कु. पार्थ सुदीप मोरे | उत्तेजनार्थ |
| ४थी | कु. शौर्य गणेश गायकर | प्रथम |
| | कु. अनुश्री महेंद्र मोहिते | द्वितीय |
| | कु. मुग्धा पोखरकर | तृतीय |
| | कु. स्वरा भास्कर नायकोडे | उत्तेजनार्थ |
| | कु. श्रिया सुरेश बेंडाळे | उत्तेजनार्थ |
| | कु. दिव्या संजय खरात | उत्तेजनार्थ |

### महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा

सरकारी नियमानुसार आता स्कॉलरशिपची परीक्षा इ. ५वी मध्ये घेतली जाते. याला अनुसरूनच इ. ४थी च्या विद्यार्थ्यांची येऊ घातेल्या स्कॉलरशिप परीक्षेसाठी तयारी करुन घ्यावी या विचारातून महाराष्ट्र टॅलेंट सर्च या परीक्षेचा उगम प्राथमिक इंग्रजी विभागात झाला. इयत्ता ४थी तील तीनही वर्गांमधील हुशार विद्यार्थी या परीक्षेत बसलेले आहेत. एकूण ६४ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग या परीक्षेसाठी नोंदवला. शिक्षकांनी ऑनलाईन व ऑफलाईनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दररोज संध्याकाळी साडेचार ते साडेपाच या वेळामध्ये या मुलांना वेगळया वर्गात बसवून त्यांची तयारी करुन घेण्यात आली. दिवाळीची सुट्टी व नाताळची सुट्टी यामध्ये दिलेला अभ्यास विद्यार्थ्यांनी गृहकार्य समजून पूर्ण केला त्यात आलेल्या अडचणी त्यांनी संबंधित विषयाच्या शिक्षकांकडून जाणून घेतल्या. अथक परिश्रम करुन हे सर्व विद्यार्थी महाराष्ट्र टॅलेंट सर्च या परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले आहेत. त्याचा निकाल लवकरच अपेक्षित आहेत. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देत मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी या विद्यार्थ्यांच्या पालकांनाही या परीक्षेचे महत्त्व समजावून सांगत निरंतर अभ्यासाच्या सूचना केल्या आहेत.

### ऑलंपियाड परीक्षा

ओलंपियाड परीक्षेत एकूण १५४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सामान्य ज्ञान परीक्षेसाठी १३, इंग्रजीसाठी ३७, विज्ञानसाठी १२ आणि गणितासाठी ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात आले तसेच ज्यांनी आपली चुणुक या परीक्षेमध्ये दाखवली त्यांना सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी शुभेच्छा दिल्या.

### अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन (Management of Learning Intervention)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अपेक्षित आहे की जागतिक विचार करणारे आणि जगाला दिशा देणारे नागरिक घडावेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्जनशील क्षमतेच्या विकासावर विशेष जोड देते.

शिक्षणाने केवळ संज्ञात्मक क्षमता विकसित करणे आवश्यक नाही तर समीक्षणात्मक विचारसरणीय समस्या निराकरण या उच्च पातळीच्या क्षमता विकसन व सामाजिक, नैतिक, भावनात्मक क्षमता विकास यांचा विचार करता येण्यासाठी आणि त्यासाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे. प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास देण्यास या प्रशिक्षणामार्फत मार्ग मोकळा झाला आहे. प्रत्येक मूल गतीने शिकू शकते व प्रत्येक मुलांमध्ये एकविसाव्या शतकातील कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षक प्रेरित होऊन कार्य करु शकतात यासाठी योग्य दिशेने काम करणे आवश्यक आहे आणि हाच उदात्त विचार मनात ठेवून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांनी शिक्षकांसाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन (Management of Learning Intervention) हे पाच दिवसांचे प्रशिक्षण जयंतीलाल वैष्णव मार्ग मनपा शाळा, घाटकोपर पूर्व येथे आयोजित केले होते. विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांच्या सह सर्व शिक्षकांनी हे पाच दिवसांचे प्रशिक्षण टप्याटप्याने पूर्ण केले. २१व्या शतकातील कौशल्ये आणि शिक्षण आत्मसात करु या. भविष्याला दिशा देणारे सुजाण नागरीक घडवणारे एक पाऊल भविष्यवेधी शिक्षणाकडे वळू अशा शुभेच्छा घेऊन सर्व शिक्षक पुन्हा एकदा नव्या जोमाने या शिक्षण प्रक्रियेत आत्मिक पाठबळ मिळाल्याच्या भावनेने झपाटून कामाला लागलेले आहेत.

### खेळ वार्षिक पारितोषिक समारंभ

पुणे विद्यार्थी गृह प्राथमिक इंग्रजी विभाग या विभागाचा खेळ वार्षिक पारितोषिक समारंभ गुरुवार दि. १८.१.२०२४ रोजी पार पडला. शिक्षक-पालक संघटनेचे सर्व सभासद या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या परेडमध्ये अतिथींचे स्वागत झाले आणि त्या परेडमध्ये सर्वजण मैदानावरती पोहोचले. स्वागतासाठी इ. १ली, २री, ३री आणि ४थी चे सर्व विद्यार्थी हजर होते. टर्फ वर होणारा हा पहिलाच कार्यक्रम होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दीपक निचित यांनी केले. इ. १ली आणि २री च्या विजेत्या स्पर्धकांची नावे श्रीमती स्वप्ना गाकवाड यांनी वाचली तर इयत्ता ३री आणि ४थी च्या विद्यार्थ्यांची नावे श्रीमती मयुरी पाटील यांनी वाचली. कार्यक्रमाची शिस्त राखण्यात आणि विद्यार्थ्यांना रांगेत आपले बक्षीस घेण्यासाठी पाठवताना श्रीमती कविता पुजारी यांची बहुमोल मदत या कामी झालेली दिसून येते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्रीमती चंदा भटकर यांनी केले व सर्व पाहुण्यांचे आभार श्री. समीर शिरकांडे यांनी मानले. आपल्या पालकांकडून खेळाची पारितोषिके घेताना विद्यार्थी आंनदीत झाले होते. आपल्या हाऊसला जास्तीत जास्त गुण मिळावेत म्हणून सर्वांचे लक्ष श्रीमती हरप्रित जयस्वाल आणि श्रीमती रेश्मा पैलकर यांच्या गुणफलकाकडे जात होते. विद्यार्थ्यांनी कष्ट घेऊन आपल्या हाऊससाठी जास्तीत जास्त गुण मिळवण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करताना दिसले. ''विद्यार्थ्यांनी दरवर्षी अशीच बक्षिसे मिळवावीत आणि आपले शरीर सुदृढ ठेवले म्हणजेच त्याचा सकारात्मक परिणाम आपल्या अभ्यासावरही होईल'', असे मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी आपल्या भाषणातून सांगितले. शिक्षक प्रशिक्षण दरम्यान वर्गाची काळजी घेणाऱ्या सर्व पालकांच्या यावेळी येथे सन्मान करण्यात आला. सतत एक उपकाराची भावना, शाळेविषयी असलेले प्रेम या पालकांमध्ये नेहमीच दिसून येते अश्या सर्व पालकांचा सन्मान करण्यात आला.

### स्तुत्य उपक्रम

दि. २२ जानेवारी २०२४ ला अयोध्या येथे निर्माण केलेल्या भव्य दिव्य अशा राममंदिरामध्ये श्री राम लल्ला ची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. या प्रसंगाचे औचित्य साधून प्रशालेत दि. २ जानेवारी २०२४ पासून रोज सकाळी ७.१० ते ७.३० या वेळेत घेतल्या जाणाऱ्या परिपाठामध्ये प्रभू श्री रामाची भजने, गीत रामायण, रामायणातील गोष्टी, अयोध्या मंदिर माहिती मुलांनी सादर केली.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

### कथाकथन स्पर्धा

शारदा प्राथमिक विद्यालयात एन विभागीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आयोजित केली होती. विभागाच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत घवघवीत असे यश संपादन केलेले आहे.

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| द्वितीय | कु. उर्वी नितीन तांबे | २री |
| | कु. हर्षदा संतोष ठोंबरे | ४थी |
| उत्तेजनार्थ | कु. वृतिका रामचंद्र नाईक | ३री |

### अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रशिक्षण

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, विद्या प्राधिकरण, मुंबई आयोजित अध्ययन प्रक्रियेने व्यवस्थापन व सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन, जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी सहा. शिक्षिका श्रीमती शिल्पकला सावंत दि. २८ नोव्हेंबर २०२३ ते दि. २ डिसेंबर २०२३ रोजी पाच दिवसीय प्रशिक्षणासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी कळंबोळी, नवी मुंबई येथे उपस्थित होत्या.

दि. १८ डिसेंबर २०२३ ते दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी या कालावधीत तालुकास्तरीय प्रशिक्षण, जयंतीलाल म.न.पा. हिंदी शाळा, घाटकोपर (प) या ठिकाणी पार पडले. प्रशिक्षणाला प्राथमिक विभागातील सहा.शिक्षक श्री. मनोहर डाफळे, सहा. शिक्षिका श्रीमती रुपल पालकर व सहा. शिक्षिका श्रीमती माया वाघमारे उपस्थित होते.

दि. २ जानेवारी २०२४ ते दि. ६ जानेवारी २०२४ रोजी या कालावधीत प्राथमिक विभागातील सहा.शिक्षिका श्रीमती प्राजक्ता वराडकर, सहा.शिक्षिका श्रीमती ज्योत्स्ना भारसाकळे, सहा. शिक्षिका श्रीमती श्वेता खोत व सहा. शिक्षिका श्रीमती मीना घाडगे प्रशिक्षणाला उपस्थित होत्या.

दि. ८ जानेवारी २०२४ ते दि. १२ जानेवारी २०२४ रोजी प्रशिक्षणासाठी मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे उपस्थित होते. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रशिक्षण, विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.

### बालचित्रकला स्पर्धा

जागतिक दर्जाचे व्यंगचित्रकार श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती उत्सवनिमित्त 'माझी मुंबई' या विषयावर महापौर आयोजित बालचित्रकला स्पर्धा रविवार दि. १४.१.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. मुंबईत विविध मैदाने व उद्याने या ठिकाणी स्पर्धा पार पडली. घाटकोपर ठिकाणी आचार्य अत्रे मैदानावर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील इ. १ली ते ४थी चे २०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, सहा.शिक्षक श्री. मनोहर डाफळे व सहा.शिक्षिका श्रीमती माया वाघमारे स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित होत्या.

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### विज्ञान प्रदर्शन

शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, उत्तर विभाग आयोजित ५१ वे 'एन' वॉर्ड स्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. ११ ते १३ डिसेंबर या कालावधीत SIES डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम मेमोरियल हायस्कूल, घाटकोपर येथे आयोजित करण्यात आले होते. त्यात आपल्या प्रशालेतील पुढील विद्यार्थी, शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांनी विविध पारितोषिके मिळविली.

| | | |
|---|---|---|
| विज्ञान प्रकल्प | दिव्यांग गट | तृतीय क्रमांक |
| प्रयोगशाळा सहाय्यक | | द्वितीय क्रमांक |

### हस्ताक्षर स्पर्धा

| गट | क्रमांक | विद्यार्थीनीचे नाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| लहान | प्रथम | कु. ज्ञानेश्वरी विजय जाधव | ८वी |
| मोठा | द्वितीय | कु. कोमल तुषार तोत्रे | १०वी |

### विज्ञान मंडळ

| क्रमांक | मार्गदर्शक शिक्षकांची नावे |
|---|---|
| तृतीय | श्री. विजय पाटील |
| | श्री. गोरख कदम |

### शालेय क्रिडास्पर्धा

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शालेय क्रिडास्पर्धा दिनांक १४ डिसेंबर ते २२ डिसेंबर रोजी गट ५वी/६वी, गट ७वी/८वी व गट ९वी/१०वी अशा तीन गटात घेण्यात आल्या. यात १०० मी. धावणे, बॉल थ्रो, लांब उडी, दोरी उडी आणि तोल सांभाळणे या वैयक्तिक खेळांचा समावेश होता तर सांघिक खेळात कबड्डी, लंगडी आणि डॉजबॉल या खेळांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला.

### निसर्ग मंडळ आयोजित मेहंदी स्पर्धा

शनिवार दि. ६ जानेवारी २०२४ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ६वी/७वी गटात रेग्युलर व अरेबिक या प्रकारात मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकूण ५५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व सहा.शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी स्पर्धेस भेट दिली व विद्यार्थिनींचे कौतुक केले. स्पर्धेचे परीक्षण श्री. अर्जुन मस्के यांनी कले. बक्षिसपात्र विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे

| प्रकार | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| रेग्युलर | कु. सुमेधा सुनील शेजवळ | प्रथम |
| | कु. यशस्वी सत्यम कांबळे | द्वितीय |
| | कु. मयुरी नितेश तोरणे | तृतीय |
| | कु. गणेश किरण घुले | उत्तेजनार्थ |
| | कु. सान्वी लक्ष्मण आव्हाड | उत्तेजनार्थ |
| | कु. किंजल नितीन कांबळे | उत्तेजनार्थ |
| | कु. रिया धनाजी जगदाळे | उत्तेजनार्थ |
| | कु. जान्हवी सुनील शिवगण | उत्तेजनार्थ |
| अरेबिक | कु. आर्या सुनील साळवी | प्रथम |
| | कु. क्रांती अशोक नरवडे | द्वितीय |
| | कु. जिज्ञासा किशोर सुकळे | तृतीय |

स्पर्धेचे आयोजन श्रीमती रत्नप्रभा पाटील व श्रीमती नंदिनी साके यांनी केले.

### उद्‌बोधन व्याख्याने

दि. ६ जानेवारी २०२४ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात 'प्रागतिक विद्यामंदीर' प्रशालेचे सहा.शिक्षक श्री. अजित पटाडे यांचे इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान - १ या विषयाचे गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

दि. ८ जानेवारी २०२४ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात ङ्कडी.एस. हायस्कूल सायनफ प्रशालेचे शिक्षक श्री. संजय मोहिते यांचे इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान - २ या विषयाचे गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

### क्रिडास्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

दि. ८ जानेवारी २०२४ रोजी विद्याभवन हायस्कूलच्या प्रांगणात विविध क्रिडा स्पर्धेत क्रमांक प्राप्त केलेल्या इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थिनींच्या ईशस्तवनाने झाली. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा व कार्यक्रमाच्या विशेष अतिथी श्रीमती जयश्री फुलपगार व इतर पालक प्रतिनिधी यांचे स्वागत स्वागतगीताने करण्यात आले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. पालक शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षा व विशेष अतिथी श्रीमती जयश्री फुलपगार यांनी सर्व

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शालेय जीवनात खेळाला फार महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाला प्राधान्य दिले पाहिजे. मोबाईलचा जास्त वापर करु नये असे मोलाचे मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी धावणे, सायकल चालवणे, मैदानी खेळ खेळणे ज्याने शारीरिक व्यायाम होईल व आरोग्याला फायदा होईल असे सुचवले व मोबाईलचा वापर कमी करुन आपला छंद व आवड जोपासली पाहिजे. सतत कार्यशील राहून पुढे जे क्षेत्र निवडाल त्यात उच्चपद प्राप्त केले पाहिजे असे मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके, पदकं, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची यादी वाचनाचे काम श्री. पद्माकर शिंगटे व श्रीमती रश्मी तळेकर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती संगीता साळी यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती जयश्री सुतार यांनी केले. 'वंदे मातरम्' ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखा**

**करियर मार्गदर्शपनर व्याख्यान**

विज्ञान शाखेतील विद्यार्थी इ. १२ वी नंतर विविध क्षेत्रात करियर संधी शोधत असतात. अशा विद्यार्थ्यांसाठी दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. संतोष कारले उंडनगावकर सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा, प्रवेश प्रक्रिया व विविध क्षेत्रातील उपलब्ध संधी या विषयी अमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना मार्गदर्शकांनी योग्य मार्गदर्शन केले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

**शालेय क्रिडास्पर्धा**

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या चालू शैक्षणिक वर्षाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा शाळेच्या भव्य मैदानावर दि. ५.१२.२०२३ ते दि. १२.१२.२०२३ या कालावधीत उत्साहात पार पडल्या. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन उपस्थित होत्या. स्पर्धेचे उद्घाटन वरील मान्यवरांच्या हस्ते पार पडले. सदर स्पर्धेत शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्रिडा प्रकारात सहभाग घेतला होता. कबड्डी, डॉजबॉल, लंगडी व क्रिकेट हे सांघिक खेळ घेतले तर वैयक्तिक खेळात धावणे, दोरी उडी, बादलीत चेंडू टाकणे इ. खेळाचा समावेश होता. स्पर्धेलीत विजेत्या खेळाडूंचा प्रमाणपत्र, मेडल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

**श्री. संदिप तावडे यांना 'कलारत्न' पुरस्कार**

महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ मुंबई उपनगर जिल्हा व शिक्षण निरीक्षक मुंबई उत्तर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कलाशिक्षकांची कार्यशाळा बुधवार दि. २०.१२.२०२३ रोजी स्वामी मुक्तानंद हायस्कूल, चेंबूर, मुंबई येथे आयोजित केली होती.

सदर कार्यशाळेत विद्याभवन हायस्कूल नं. २ चे कलाशिक्षक श्री. संदिप तावडे यांच्या शैक्षणिक, कला व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन कलारत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

श्री. संदिप तावडे यांचे त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

***

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊




कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृतिप्रित्यर्थ आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेतील सांघिक विजेते पद विद्याभवन घाटकोपर शाळेस देताना श्री. सुभाष म्हात्रे, मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व सौ. श्रुती पांढारकर



कुलगुरु दादासाहेब केतकर स्मृतिप्रित्यर्थ आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील सांघिक विजेते पद विद्याभवन नेरुळ कनिष्ठ महाविद्यालयास देताना श्री. जगन्नाथ ठाकूर, श्रीमती अपर्णा वाघरे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहा.शिक्षक श्री. नाना वना पाटील, सहा.शिक्षक श्री. सुजय वाबळे



टेबल टेनिस स्पर्धा विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करताना माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी सोबत मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



क्रीडा स्पर्धेत बक्षिस प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींना मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करताना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार



क्रीडा स्पर्धेत बक्षिस प्राप्त केलेल्या विद्यार्थिनीचे प्रमाणपत्र देऊन कौतुक करताना उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई




महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळातर्फे विद्याभवन नं. २ चे सहा. शिक्षक श्री. संदिप तावडे यांना कलारत्न पुरस्काराने गौरविण्यात आले

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

## ''क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती'' उत्साहात साजरा

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, शिक्षकतज्ञ आणि कवयित्री ''क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले'' यांची जयंती कार्यवाह श्री. संजय नि. गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली.

याप्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा., संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे यांनी केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवना विषयी माहिती देताना समाजातील बिकट परिस्थितीचा सामना करून शिक्षण पूर्ण केले. समाजातील मुली आणि महिला यांच्या हक्कासाठी आणि शिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. मुलीसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांचा जन्मदिन बालिका दिवस म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर यांनी सर्वांचे आभार मानले.

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरा

महाविद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे यांनी केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे यांनी आपल्या प्रास्ताविकेत बोलताना जिजाऊ यांनी शिवाजी महाराजांचा सारखे पुत्र तयार करून राष्ट्र भक्ती आणि समाज जागृती करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. स्वामी विवेकानंद यांनी तंत्रज्ञानाची गरज असल्याचे सांगितले. युवकानी त्यांचा आदर्श समोर ठेऊन भारतच्या २०४७ प्रगती कडे लक्ष देण्याची गरज आहे.

प्रा. संदीप दिवे यांनी आपल्या मनोगतामध्ये बोलताना सन १८०० च्या उत्तरार्धात जिथे सामान्य भारतीयांना त्यांच्या गाव सीमा ओलांडणे देखील शक्य नव्हते, तिथे स्वामी विवेकानंदांनी महासागराच्या पलीकडे जाऊन भारतीय संस्कृती व हिंदु धर्माचा प्रचार व प्रसार केला. तरुणांसाठी दिलेले त्यांचे ब्रीदवाक्य ''धाडसी व्हा, खंबीर व्हा, संपूर्ण जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घ्या'' आजही करोडो तरुणांना त्यांच्या देशासाठी आणि धर्मासाठी उभे राहण्याची प्रेरणा देते. स्वामीजी नेहमी म्हणायचे की सशक्त शिक्षणाशिवाय देश मजबूत होऊ शकत नाही. स्वामी विवेकानंदांचे जीवन हे खऱ्या अर्थाने आजच्या व येणारी कित्येक तरुण पिढ्यानसाठी प्रेरक व मार्गदर्शक ठरणार आहे.

सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर यांनी उपस्थितांचे आभार मानले तसेच कार्यक्रमासाठी कु. प्राजक्ता देवरे यांचे सहकार्य लाभले.

## पालक मेळावा संपन्न

महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थी आणि पालक यांचा मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमास कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. मनोज

भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, डॉ. अमोल रासने, प्रा डॉ. सोनाली जाधव, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. सतीश भदाणे, ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पालक प्रतिनिधी प्रा. दिपाली घोगरे यांनी स्वीकारले. दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा. शैलेंद्र शुक्ला यांनी पालकांना मेळाव्याची प्रस्तावना विशद केली व पालकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील असलेल्या स्थान आणि त्यांची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा. इंद्रजीत सोनवणे यांनी संस्थेत राबवण्यात येणाऱ्या विविध ट्रेनिंग आणि प्लेसमेंट उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४ मध्ये प्लेसमेंट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित पालक वर्गांतर्फे सौ चौधरी, श्री बागुल व श्री देवरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संस्थेच्या विविध उपक्रमांचा परिचय आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम याविषयी प्रा. डॉ. मनोज भालेराव यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ दिपाली घोगरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावे याविषयी पालक वर्गाची जबाबदारी विशद केली.

कार्यवाह श्री संजय एन. गुंजाळ यांनी संस्थेच्या ११४ वर्षाच्या इतिहासाचा परिचय करून देतांनी संस्था तळा गाळातील गोर गरीब विद्यार्थ्यांसाठी काम करते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश कुलकर्णी यांनी तर प्रा.सुहास धारणे यांनी आभार प्रदर्शन केले.

### 'नॅशनल स्टार्टअप डे' साजरा

महाविद्यालयामध्ये कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व प्राचार्य डॉ. एम. व्हि. भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स व टेलेकम्युनिकेशन विभागाने आयोजित केलेला 'नॅशनल स्टार्टअप डे' उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'आर्मस्ट्रॉग डीमॅटिक' चे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रणव माजगावकर व एच. आर. त्रिरश्मी निकम उपस्थित होते. श्री. प्रणव माजगावकर यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप कसे सुरू करावे व त्यात येणाऱ्या अडचणीचा कसा सामना करावा या बद्दल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.चेतना अहिरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरा

महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यवाह श्री. संजय नि. गुंजाळ यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव, सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा., संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे यांनी केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे यांनी आपल्या प्रास्ताविकेत बोलताना प्रभावी विचारांनी, तेजस्वी वकृत्त्वाने आणि लढाऊ बाणा अंगीकारत ब्रिटीश राजवटीशी लढा देणारे एक वादळी व्यक्तीमत्त्व म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस असे वर्णन केले. कुशाग्र बुद्धिमत्ता व कठोर परिश्रमाच्या जोरावर देशाला स्वतंत्र मिळवण्यासाठी त्यांनी लढा दिला.

सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर यांनी उपस्थितांचे आभार मानले. तसेच कार्यक्रमासाठी कु. प्राजक्ता देवरे यांचे सहकार्य लाभले. ***

# श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ** **प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिर दि. १७.१.२०२४ ते २३.१.२०२४ या दरम्यान मु. पो. रासेगाव ता. दिंडोरी जि. नाशिक या गावात आयोजित करण्यात आले आहे.

आज या शिबिराचे उद्घाटन सकाळी ११.३० वाजता प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि रासेगावच्या सरपंच सौ. मंदा बेंडकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

कार्यक्रमासाठी प्रशोध पिल्ले सिव्हिल इंजिनियर ऑस्ट्रेलिया यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. आपल्या मार्गदर्शनात बोलताना त्यांनी भारतातील थोर महापुरुषांचा आदर्श घेण्याचा सल्ला दिला शिवाय मागील वर्षी केलेल्या कामांचे कौतुक केले आणि आपल्या शिबिरामध्ये हुंडाबळी या कुप्रथेविषयी जागरूकता निर्माण करण्याची सूचना विद्यार्थ्यांना केली.

मातोरी गावच्या सरपंच सौ. मंदा बेंडकुळे आणि माजी उपसरपंच योगिता मोरे यांनी देखील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या व शिबिरा दरम्यान गावाकडून आणि ग्रामपंचायतीकडून संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

प्राचार्य डॉ. एस. जी. वाकचौर यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही एक चळवळ असल्याचे सांगितले. शिवाय गावासमोर आपल्या कार्यातून एक आदर्श निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवकांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक अर्जुन पगारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका मनीषा जाधव हिने केले. आभार स्वयंसेवक भूषण ठाकूर यांनी केले. या प्रसंगी प्रा. हेमांगीनी पाटील, प्रा. मीनल जाधव, प्रा. जयमाला सातपुते, प्रा. योगिता ककाड, प्रा. शाम सोनवणे, प्रा. नितेंद्र जंगले, प्रा. श्वेता चोपडेकर, प्रा. तृप्ती पांडे, श्री. संदीप देटके, श्री. गणेश कुलकर्णी, श्री. लोकेश खलाने, श्री. सचिन देव उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर रासेगावात आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा आज शेवटचा दिवस, सकाळी श्रमदानाने दिवसाची सुरुवात करण्यात आली.

दुपारी साडेतीन वाजता शिबिराचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, रासेगावच्या सरपंच सौ. मंदा बेंडकुळे, माजी सरपंच योगिता मोरे, रासेगावचे ग्रामसेवक श्री. थोरात, ग्रामपंचायतचे इतर सदस्य, रासेगाव चे ग्रामस्थ व महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. रासेगावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राबवलेल्या उपक्रमाचे ग्रामपंचायतीकडून स्वागत करण्यात आले. सरपंच यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामांचे कौतुक करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामाला चळवळ म्हणून संबोधित करत, विद्यार्थ्यांनी राबवलेल्या उपक्रमांची प्रशंसा केली व विद्यार्थ्यांना भविष्यात देखील सामाजिक कामांमध्ये स्वतःला सामावून घेण्याचे आवाहन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हॅन्ड बॉल संघात निवड


कु. हर्षदा कस्तुरे

२०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात नाशिक विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. इगतपुरी येथील महाविद्यालयात झालेल्या आंतर महाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धेत नाशिक विभागीय संघात महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी कु. हर्षदा कस्तुरे हिची निवड करण्यात आली. या विद्यार्थिनीची नाशिक विभागातर्फे नाशिक झोन या संघात ओतूर पुणे येथे होणाऱ्या विभागीय संघात निवड झाली व तिने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.


कु. अजिंक्य सोनवणे

नाशिक जिल्हा आंतर महाविद्यालयीन हॅन्ड बॉल स्पर्धा मखमलाबाद महाविद्यालयात आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील द्वितीय वर्ष संगणक शास्त्र वर्गातील विद्यार्थी चि. अजिंक्य सोनवणे याने सहभाग नोंदवला. त्याची निवड विभागीय संघात ओतूर पुणे येथे करण्यात आली. त्यात त्याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात निवड झाली. मध्य प्रदेश येथील सागर या शहरातील महाविद्यालयामध्े महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक श्री. नितेंद्र जंगले यांचे मार्गदर्शन लाभले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कार्यवाह संजय गुंजाळ व प्राचार्य डॉ. संजय जी. वाकचौरे यांनी अभिनंदन केले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ-नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### वार्षिक क्रिडा महोत्सव उत्साहात साजरा

नोव्हेंबर २०२३ रोजी वार्षिक क्रिडा महोत्सव साजरा झाला. या महोत्सवाचे उद्घाटन कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. खो-खो, हॉलीबॉल, १०० व २०० मी. रनिंग, गोळा फेक, स्लो सायकलिंग अशा विविध मैदानी क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सांघिक क्रिडा प्रकारांमध्ये मुलांच्या व मुलींच्या येल्लो हाऊस संघाने विजेतेपद पटकावले.

### हॉर्ट फुलनेस आयोजित निबंध स्पर्धेत कु. श्रेया आहेर हिला घवघवीत यश

हार्ट फुलनेस (श्री. रामचंद्र मिशन) ही शैक्षणिक आणि आध्यात्मिक संस्था आहे. ही संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक बदल घडवून आणण्यासाठी विविध विषयावर स्पर्धा आयोजित करते.१९४५ मध्ये स्थापन झाल्यापासून ७५ वर्षाहून अधिक काळ सार्वत्रिक शांततेचे साधन म्हणून ध्यानाद्धारे ह्रदयावर आधारित जीवन जगण्याचा प्रचार ही संस्था करते. हार्ट फुलनेस आयोजित निबंध स्पर्धेत जागतिक स्तरावर अनेक विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत विद्यार्थिनी कु. श्रेया दत्तात्रेय आहेर (इ.१०वी) हिने संपूर्ण भारतातून ७ वा क्रमांक मिळवत नेत्र दीपक यश संपादन केले. इंग्रजी भाषेत निवड झालेली कु. श्रेया ही महाराष्ट्रातील


कु. श्रेया आहेर

एकमेव विद्यार्थिनी आहे. कु. श्रेया आहेर हिस शिक्षिका सौ. वैशाली गाजरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**चित्रकला स्पर्धा**

डिसेंबर २०२३ रोजी इ.८व इ.९वी च्या विद्यार्थ्यांची सृजनशीलता आणि कल्पनाशक्तीला प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने शाळेने हे कला प्रदर्शन आयोजित केले होते. यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. त्यात विद्यार्थ्यांनी स्वतः रेखाटलेले मंडलआर्ट, स्टोन पेंटिंग, हस्तकला, कटपुतली, इ. चित्र विद्यार्थ्यांनी सादर केले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना त्याचे वेगवेगळे पण दाखवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळा नेहमीच अशा कार्यक्रमाचे आयोजन करत असते. या सर्व कला गुणांनी युक्त असलेल्या विद्यार्थ्यांचे पालकांनी, शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी कौतुक केले. या प्रदर्शनासाठी कला शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

**आकाश दर्शन एक शैक्षणिक क्षेत्र भेट**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी तसेच अंतराळ विज्ञानाचे ज्ञान समृद्ध करण्याच्या उद्देशाने इ.८वी व इ.९वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि.१६ डिसेंबर २०२३ रोजी स्वामी विवेकानंद केंद्र, त्र्यंबकेश्वर पिंपळद, नाशिक येथे शैक्षणिक क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान विद्यार्थ्यांनी तारे ग्रह नक्षत्र आणि विविध खगोलीय वस्तूच्या जीवन चक्रा विषयी स्लाईड शोद्वारे माहिती देण्यात आली.

रात्रीच्या अंधारात आकाशात लेझर बीमद्वारे तारे ध्रुव तारा इ. विविध नक्षत्र समूह दाखविण्यात आले. अंतराळातील सौंदर्य बघण्यासाठी विद्यार्थी खूपच उत्साही झाले होते. तसेच विद्यार्थ्यांना दुर्बिणीद्वारे गुरु ग्रह आणि त्यांचे चंद्र आणि पृथ्वीचे चंद्र्याचे निरीक्षण करण्याची अद्भुत संधी मिळाली. या अभिनव क्षेत्रभेटीसाठी शाळेच्या विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षिका आणि शाळेच्या मुख्याध्यापिका यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**उच्च माध्यमिक विभागात सायबर सेक्युरिटी कार्यशाळेचे आयोजन**

इ.११वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सेक्युरिटी ची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत आय एस ए सी संस्थेचे श्री. शेख आणि श्री. समीर प्रीत यांनी विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी कायदे विषयी माहिती दिली.तसेच यातील सरकार मान्य जागतिक स्तरावरील मान्यता कोर्स विषयी तसेच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्धते विषयी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी उपयुक्त असलेल्या या कार्यशाळेच्या नियोजनासाठी मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रतिभा शोध स्पर्धेत यश**

स्टेट बँक ऑफ इंडिया, नाशिक विभाग यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला गेला. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देणारी ठरली. हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, कला स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये खालील विद्यार्थ्यांना कलारंग स्पर्धा पुरस्कार व सुवर्णपदक मिळाले.

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इयत्ता** |
|---|---|
| कु. सृष्टी तुषार सरोदे | मोठा गट |
| कु. श्राव्या तुषार गांगुर्डे | मोठा गट |
| कु. मनस्वी योगेश रसाळ | नर्सरी |
| कु. जानवी अर्जुन खताळ | मोठा गट |
| कु. भार्गव अभिषेक दीक्षित | नर्सरी |
| कु. श्रावणी प्रशांत अहिरराव | लहान गट |
| कु. साची शैलेश वेलानी | मोठा गट |
| कु. ओवी महेश अहिरे | मोठा गट |

**अभिनंदनीय**

* ॲबेकस ॲकेडेमी, चेन्नई द्वारे आयोजित rainbow या स्तरावरील mental maths परीक्षेमध्ये विद्यार्थिनी कु. समायरा गोसावी हिने द्वितीय

क्रमांक मिळविला. कु. समायरा हिला सुवर्णपदक, ट्रॉफी आणि सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

* तामिळनाडू आणि केरळ मधील 'कलरीपयट्टू' या कराटेचा पारंपारिक प्रकार आहे. पाँडेचेरीनंतर आता नाशिकमध्ये सुरू झाला. यामध्ये मोठा गटातील विद्यार्थिनी कु. श्रेया अग्निहोत्री हिने भाग घेऊन व्हाईट बेल्टसह प्रथम क्रमांक मिळविला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**प्र. मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### हिवाळी क्रिडा महोत्सव

दि. २१ डिसेंबर २०२३ ते २३ डिसेंबर २०२३ या कालावधीत विद्यालयामध्ये हिवाळी क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संचालक श्री. अमोल जोशी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण व क्रिडाज्योत प्रज्वलित करून महोत्सवाचे अधिकृत उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी संचालक श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांना क्रिडा महोत्सवाच्या शुभेच्छा देतानाच खिलाडुवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. याप्रसंगी जिल्हास्तरीय गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. साक्षी शांताराम खांडबहाले या विद्यार्थिनीचा सत्कार संचालकांनी केला. यावेळी इयत्ता अकरावी व बारावी या वर्गांमध्ये रस्सीखेच स्पर्धेचा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. आभार क्रिडा शिक्षक श्री. संजय गीते यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राजेंद्र जगताप यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री शरद कोठावदे यांनी प्रतिमा पूजन केले. यावेळी वर्ग मंत्री असलेल्या विद्यार्थिनींचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला श्रीमती प्रीती राजपूत यांनी सुप्रसिद्ध कवयत्री मंगला राजपूत यांची सावित्रीच्या लेकी ही कविता सादर करून सावित्रीबाई फुले यांच्या जीवना विषय विद्यार्थ्यांना यथोचित माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

### श्री दत्त जयंती

दि. २६ डिसेंबर २०२३ रोजी विद्यालयात श्री दत्त जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते श्री दत्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी श्री गुरु दत्तांनी केलेल्या २४ गुरूंची माहिती सांगताना आपल्या जीवनातील गुरुचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यार्थ्यांनी श्री गुरुदत्त स्तवनाचे श्लोक सादर केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ सुषमा अमृतकर यांनी केले. श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद यांची जयंती व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी प्रतिमांचे पूजन केले. यावेळी इयत्ता सातवी अ च्या विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या जीवनाविषयी पाळणा सादर केला. जिजाऊंच्या जीवन कार्याविषयी श्री. सुरेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाविषयी

सौ. सुषमा अमृतकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुखदेव निंबेकर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती प्रीती रजपूत यांनी केले. श्री सुरेश वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### अभिनंदनीय वृत्त

'बेटी बचाव बेटी पढाव' या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत कु. दिया अशोक भालेराव इयत्ता सहावी अ या विद्यार्थिनीने काढलेल्या चित्राची तालुकास्तरावर प्रथम क्रमांकाने निवड झाली. विशेष अभिमानाची बाब ही की सदर चित्र नाशिक पंचायत समिती येथील मा. गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयात फ्रेम करून लावण्यात आलेले आहे. सदर विद्यार्थिनी श्रीमती रक्षा शिवदे, सौ. सुषमा अमृतकर व श्री. प्रकाश गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.

### विभागीय स्तरावरील लंगडी स्पर्धा

नाशिक येथे शालेय क्रिडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या विभागीय स्तरावरील लंगडी स्पर्धेत नवापूर संघाचा दणदणीत पराभव करणाऱ्या विद्यालयातील मुलींच्या संघाची मुरबाड जिल्हा ठाणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तर मुलांचा संघ




**'बेटी बचाओ बेटी पढाओ'**
**या उपक्रमांतर्गत**
**चत्रकले स्पर्धेत तालुका स्तरावर**
**प्रथम क्रमांक मिळविणारी विद्यार्थिनी**
**कु. दिया अशोक भालेराव**

उपविजेता ठरला. या संघांना पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी व श्री. संजय गीते यांचे मार्गदर्शन लाभले

### माजी विद्यार्थी मेळावा

दि. १८ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात सन २००१ मध्ये दहावीत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना संचालक श्री. अमोल जोशी यांनी विद्यालय व संस्थेच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे असतात असल्याचे सांगताना विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांची माहिती दिली. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी वर्षभरात विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाची माहिती दिली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयात शिकत असतानाच्या आठवणींना उजाळा देत विद्यालय व संस्थे प्रती कृतज्ञता व्यक्त केली यावेळी माजी विद्यार्थ्यां तर्फे शिक्षकांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्रीमती प्रीती राजपूत यांचा 'आदर्श शिक्षिका' म्हणून गौरव करण्यात आला.

### कनिष्ठ महाविद्यालयाची सहल

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाची सहल 'शांग्रीला वाटर पार्क' व जोगेश्वरी देवस्थान येथे गेली होती. यात ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

**✻ विद्या प्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं), नाशिक ✻**



क्रिडा ज्योत प्रज्वलित करून क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन करतांना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, क्रिडा शिक्षक श्री. संजय गीते



शालेय क्रिडा स्पर्धेत विभागीय पातळीवर लंगडी स्पर्धेत विजय मुलींचा व उपविजेता ठरलेल्या मुलांच्या संघासमवेत पर्यवेक्षक श्री संजय जोशी व श्री संजय गीते व उपस्थित क्रिडा अधिकारी वर्ग

## शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

### वार्षिक स्नेहसंमेलन

शुक्रवार दि. १२ जानेवारी २०२४ रोजी टिळक स्मारक रंगमंदिर, टिळक रोड, पुणे येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या माजी उपप्राचार्या डॉ. सौ. सुप्रिया अत्रे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी प्रास्ताविक केले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. सौ. सुप्रिया अत्रे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. सौ. सुप्रिया अत्रे यांनी समर्थ रामदासांच्या गोष्टी रुपातून मुलांना घडविताना त्यांच्या मनावर झालेले आदर्श संस्कार कसे सक्षम बनवतात तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काय करावे याचे मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे आणि उपस्थितांचे आभार मानले. श्रीमती मंदाकिनी भोसले आणि सौ. श्रध्दा ताम्हणकर यांना 'उत्कृष्ट शिक्षिका' म्हणून गौरविण्यात आले. बक्षीस पात्र विद्यार्थी आणि शिक्षकांचा मान्यवरांनी कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. बालवाडी ते इ. ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

✻✻✻

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**माजी विद्यार्थी मेळावा**

यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या वतीने दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यासाठी देश - विदेशातील ४८ विद्यार्थी उपस्थित राहिले होते.

या मेळाव्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. विभागाच्या प्रगतीसाठी विविध विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी श्री. नितीन गव्हाणे, जनरल मॅनेजर ट्रेनिंग थिसेनेकृप इंडस्ट्री पिंपरी पुणे या प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासासाठी विविध घटकांवर प्रकाश टाकला. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रमुख सौ. वर्षा सोहोनी व सौ. मधुरा महाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारंबळे यांनी विद्यार्थ्यांचे विचार कृतीत आणण्याचे आश्वासन दिले. विभागप्रमुख डॉ. मनमोहन भूमकर यांनी सर्वाचे आभार मानले.

**अभिनंदनीय**

फॉर्म्युला भारत २०२४ या 'आंतरराष्ट्रीय स्टुडन्ट फॉर्मुला कार डिझाईन व रेसिंग स्पर्धे'मध्ये यंत्र अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. सदर स्पर्धा १९ ते २४ जानेवारी २०२४ या कालावधी दरम्यान क्युरिऑसम टेक संस्थे मार्फत 'कारी मोटर स्पीडवे' कोईम्बतूर, तमिळनाडू येथे आयोजित करण्यात आली होती.

या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये भारत तसेच परदेशातील ७६ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये आंतराष्ट्रीय ज्युरी मार्फत विद्यार्थी संघांचे मुल्यमापन करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये यंत्र अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच स्किड पॅड इव्हेंट - प्रथम पारितोषिक, बिझनेस प्लॅन - द्वितीय पारितोषिक, इंजिनियरिंग डिझाईन - तृतीय पारितोषिक व बेस्ट ड्रायवर अवॉर्ड मिळविले.

या संघाच्या कर्णधार पदी कु. सुमित धाणेदार व उपकर्णधार पदी कु. कौशिक सावळे व प्राध्यापक सल्लागार पदी प्रा. विशाल चव्हाण यांनी काम पहिले. या स्पर्धेमध्ये फॉर्मुला रेसिंग कार चालक कु. जय देसाई, कु. सोहम ढगे, कु. धवल पाटील व कु. ऋग्वेद सिंगम यांनी चालविली.

या यशाबद्दल पुणे विद्यार्थी गृहाच्या संचालक मंडळ, प्राचार्य व विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा संघ व प्राध्यापक विशाल चव्हाण यांचे विशेष कौतुक केले. तसेच दि. २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉक्टर डी. बी. शेकटकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी मिळविलेल्या भरघोस यशाबद्दल विशेष कौतुक केले.

**डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, खडकवासला, पुणे यांचेशी महाविद्यालयाचा सामंजस्य करार**

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय आणि डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, खडकवासला, पुणे (DIAT) यांचेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, खडकवासला यांच्या वतीने महाविद्यालयातील विविध विद्याशाखांमधील सुमारे ५० विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन महिन्यांची एन्टर्नशिप करण्याची संधी मिळणार आहे. या एन्टर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध प्रयोगांवर काम करण्याची आणि तेथील अद्ययावत लॅबोरेटरीजचा वापर करण्याची संधी मिळणार आहे.

***

# विद्याभवन–नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा नायर**

### थ्रोबॉल स्पर्धा

दि. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, नवी मुंबई शहर द्वारे थ्रोबॉल स्पर्धा एपीजे स्कूल, नेरुळ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटात खालील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. सर्व विजेत्या खेळाडूंचे शाळा व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन! विजेत्या संघातील खेळाडूंची नावे खालीलप्रमाणे

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | क्र. | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|---|
| १. | कु. सोनम पाटील | १३. | कु. श्रेया भोर |
| २. | कु. आर्शलिन चहल | १४. | कु. ओवी पिंगळे |
| ३. | कु. पूजा सुतार | १५. | कु. श्रुती पानसरे |
| ४. | कु. श्रुती मिश्रा | १६. | कु. पूर्वी पवार |
| ५. | कु. आस्था तिवारी | १७. | कु. आर्या बुधावळे |
| ६. | कु. तनिषा मोरे | १८. | कु. कनिका भोपी |
| ७. | कु. जेन्सी भगत | १९. | कु. आरुषी सिंग |
| ८. | कु. भक्ती चव्हाण | २०. | कु. सिमरन सिंग |
| ९. | कु. खुशी सिंग | २१. | कु. सई मोते |
| १०. | कु. साक्षी पात्रा | २२. | कु. वैष्णवी जाधव |
| ११. | कु. मनाली शिर्के | २३. | कु. अनघा शेळके |
| १२. | कु. कृपा शितकर | | |

### तायक्वांदो स्पर्धा

दि. २२ नोव्हेंबर २०२३ रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, नवी मुंबईद्वारे तायक्वांदो स्पर्धा वारकरी भवन बेलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत कु. आदर्श चौहान या विद्यार्थ्याने कांस्य पदक प्राप्त केले.

### होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२३

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन तर्फे आयोजित होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा २०२३ मध्ये घेण्यात आली. सदर परीक्षेमध्ये माध्य. इंग्रजीच्या दोन विद्यार्थिनींची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थिनींची नावे खालीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. अनघा शेळके | ९ वी |
| कु. वैष्णवी कुलकर्णी | ६ वी |

### वार्षिक सहल

दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी विभागाची सहल टिकू-जी-नी वाडी ठाणे येथे आयोजित केली होती. सहलीत एकूण ३८० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध झोके, आकाश पाळणे, राइड्स, वॉटर पार्कचा मनसोक्त आनंद लुटला.

### वार्षिक क्रीडा महोत्सव

दि. ८ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२३ या कालावधीत क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संचालक श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या हस्ते क्रिडा ज्योत प्रज्वलित करुन क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासासाठी खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे असे सांगत विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन केले. समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांना क्रिडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व खेळाचे महत्त्व विशद केले. डॉजबॉल, व्हॉलीबॉल व थ्रोबॉल अशा सांघिक खेळांचा तर लंगडी, दोरी उड्या, गोळाफेक अशा वैयक्तिक खेळांचा समावेश क्रीडा महोत्सवात करण्यात आला होता. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन श्रीमती सायरा टोले यांनी केले.

### चिन्मय मिशन श्लोक स्पर्धा

दि. १० डिसेंबर २०२३ रोजी खारघर येथे चिन्मय मिशन श्लोक पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. गार्गी गोळे | तिसरा |
| कु. गार्गी कांबळे | तिसरा |
| कु. कृपा शितकर | उत्तेजनार्थ |

### आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा ९ डिसेंबर रोजी घाटकोपर येथे घेण्यात आली. या स्पर्धेत कु. अनघा अभय शेळके (इ.९वी) हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील सुयश

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात कु. आर्या नाक्ती व कु. आरीज पटवेगर या विद्यार्थ्यांनी टेस्ला कॉईल या प्रयोगासाठी द्वितीय क्रमांक पटकावला.

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा,नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

दि. १०.१२.२०२३ रोजी शाळा स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची विभाग स्तरावरील चिन्मय मिशन गीता पाठांतर स्पर्धा खारघर येथे संपन्न झाली. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

| विद्यार्थ्याचे नाव | ग्रुप | क्रमांक |
|---|---|---|
| कु. निहारिका प्रबोध फडके | बी | तृतीय |
| कु. वृद्धी विकास वीर | बी | उत्तेजनार्थ |
| कु. प्रणिती रुपेश कळंत्रे | बी | उत्तेजनार्थ |
| कु. प्रणिती रुपेश कळंत्रे | ई | उत्तेजनार्थ |
| कु. हर्षिता विनायक वारगे | ई | उत्तेजनार्थ |

### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात परीक्षक म्हणून नियुक्ती

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, समूहसाधन केंद्र - तुभे, इंदिरानगर अंतर्गत ५१ वे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन -२०२३ च्या अनुषंगाने केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन व शैक्षणिक साहित्यनिर्मिती या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राथमिक मराठी विभागाच्या श्रीमती कविता विनय तेंडुलकर यांनी कामकाज पाहिल्याबद्दल शिक्षणाधिकारी मा. श्रीमती अरुणा यादव यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### वार्षिक क्रिडा स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक क्रिडा स्पर्धा दि. ११ डिसेंबर २०२३ ते १६ डिसेंबर २०२३ या कालावधीत संपन्न झाल्या. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन झाले. इ. ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्लो-सायकलिंग, धावणे, दोरी उड्या, गोळा फेक व थाळी फेक या वैयक्तिक स्पर्धा तर खो-खो, कबड्डी, क्रिकेट या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. इ. १ली ते इ. ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी धावणे लंगडधाव, संगीत-खुर्ची, उलट चाल, बॉल बॅलन्सिंग या वैयक्तिक स्पर्धा तर लंगडी ही सांघिक स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना मेडल व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

### स्काऊट गाईड शिबिर

दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी इ. ७वीच्या वर्गाचे स्काऊट गाईड शिबिर आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी दिलेल्या गटानुसार शालेय मैदानात नियोजनपूर्वक तंबू उभारले होते. प्रत्येक गटाने कल्पकतेने आपल्या तंबूची सजावट केली होती. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी तंबूची पाहणी करत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. ध्वजारोहण, सर्वधर्म प्रार्थना याने शिबिराची सुरुवात झाली. संध्याकाळी शेकोटी पेटवून त्याभोवती विद्यार्थ्यांनी गायन व नृत्य सादर

केले. रस्सी खेच, ट्रेझर हंट यांसारखे खेळ खेळण्यात आले. त्यानंतर प्रत्येक गटाने त्यांना दिलेला नृत्यप्रकार शिक्षकांच्या सोबत सभागृहात सादर केला. स्वावलंबन स्वयंशिस्त, प्रसंगावधान यासारख्या अनेक गुणांचे शिक्षण या शिबिरातून अप्रत्यक्षपणे विद्यार्थ्यांनी आत्मसात केले. सहभोजनाने या शिबिराचे सांगता झाली.

### मनपास्तरीय शिक्षक प्रशिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे, राज्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहातोली, ठाणे मार्फत आयोजित अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हे नवी मुंबई महानगरपालिका स्तरीय प्रशिक्षण इ. १वी ते ५वीच्या शिक्षकांकरिता आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास दि. १२.१२.२०२३ ते १६.१२.२०२३ या कालावधीत श्रीमती कविता तेंडुलकर व श्रीमती मेघाराणी जोशी यांनी प्रशिक्षण घेतले. शाळा व विद्यार्थी यांच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी एका दीपस्तंभाचे कार्य या प्रशिक्षणातून शिक्षकांनी जाणून घेतले.

### शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धेत शिक्षक सुयश

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग ५१ वे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२३ च्या अनुषंगाने आयोजित शैक्षणिक साहित्य निर्मिती या स्पर्धेत शिक्षिका श्रीमती राधिका भोसले यांनी इ. १ली ते ८ वी च्या गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल शाळेच्या व संस्थेच्या वतीने त्यांचे खूप खूप अभिनंदन व शुभेच्छा! विज्ञान विषयावर आधारित विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य त्यांनी तयार केले होते. वातावरणाचे थर, धातू व अधातू यांचे गुणधर्म, फुलांचे भाग इ. विज्ञानाशी संबंधित घटकांवर त्यांनी आकर्षक शैक्षणिक साहित्य तयार केले होते.

# विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षक : सौ. अस्मिता सलगर**

### गीता पाठांतर स्पर्धा

दि. १०.१२.२०२३ रोजी चिन्मय मिशन, खारघर, नवी मुंबई यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नवी मुंबईतील विविध ८ शाळेतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग झाले होते. विभागातील एकूण ८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन घवघवीत यश प्राप्त केले. विजेत्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इ/तुकडी | क्रमांक |
|---|---|---|
| कु. नाव्या रामा धुरीमोठा | शिशु/अ | द्वितीय |
| कु. सानवी सचिन टेकाळे | छोटा शिशु/अ | तृतीय |
| कु. दुर्वा रोहन इंगवले | मोठा शिशु / ब | तृतीय |
| कु. मिष्टी रजनीश चतुर्वेदी | मोठा शिशु/अ | तृतीय |
| कु. दिया विकास चौधरी | मोठा शिशु/अ | उत्तेजनार्थ |

कु. नाव्या रामा धुरी हिची पुढील पातळीसाठी निवड झाली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!

***

### निधन वार्ता

* संस्थेचे देणगीदार व हितचिंतक श्री. चंद्रकांत सदाशिव सरोदे यांचे दि. १३.१२.२०२३ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

* संस्थेचे सदाचार विभागाचे सेवक श्री. राजेंद्र भास्कर काळे यांचे लहान भाऊ कै. निवृत्ती भास्कर काळे यांचे दि. ४ जानेवारी २०२४ रोजी वयाच्या ३८ व्या वर्षी अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !**

***

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻



चिन्मय मिशन आयोजित गीता पाठांतर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका व पर्यवेक्षिका



नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर शिक्षक शैक्षणिक साहित्या निर्मिती स्पर्धेत शिक्षणाधिकारी सन्मा. श्रीमती अरुणा यादव यांच्या हस्ते द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविणाऱ्या प्राथमिक मराठीच्या शिक्षिका श्रीमती राधिका भोसले

## ✻ शिशुनिकेतन, पुणे ✻



दि. १२ जानेवारी २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण प्रसंगी डॉ. सौ. सुप्रिया अत्रे, माजी उपप्राचार्या एस.एन.डी.टी. महाविद्यालय यांचा सत्कार करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**हेडमिस्ट्रेस : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

हिवाळी सुट्टीनंर दि. २ जानेवारी २०२४ रोजी शाळा नियोजित वेळेनुसार उत्साहात सुरु झाली.

### लेखी दुसरी घटक चाचणी

दि. १६ जानेवारी ते दि. २४ जानेवारी २०२०४ दरम्यान छोट्या व मोठ्या गटाची दुसरी घटक चाचणी घेण्यात आली.

### मकर संक्रांत उत्साहात साजरी

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी मकर संक्रांत सणानिमित्त शिशु गटाच्या शिक्षिकांनी पतंगाचे चित्र विद्यार्थ्यांना काढून दिले व विद्यार्थ्यांनी ते त्यांच्या वहीमध्ये चिकटविले. छोट्या गटाच्या शिक्षिकांनी रंगीत कागदाचे पतंग बनवून ते विद्यार्थ्यांकडून ढगाच्या आकाराच्या चित्रावर चिकटवले. मोठ्या गटाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यावहीमध्ये पतंगाच्या चित्रावर रंगीत कागदाचे तुकडे करून चिकटविले. संक्रांतीनिमित्त सर्व विद्यार्थी रंगीत कपडे घालून आणि डब्यामध्ये गुळाची पोळी घेऊन आले होते.

## प्राथमिक विभाग

हिवाळी सुट्टीनंतर दि. २ जानेवारी २०२४ रोजी प्राथमिक विभागाची शाळा नियोजित वेळेत उत्साहात सुरु झाली.

### सावित्रीबाई फुले जयंती

दि. ४ जानेवारी २०२४ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्हासात साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. अमिता पवार यांनी सावित्रीबाई फुलेंच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

### अतिथी व्याख्यान

दि. ९ जानेवारी २०२४ रोजी इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यात्या सौ. शर्मिला गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील शब्दोच्चारांवर भर देत त्यांचे स्पष्ट, अर्थपूर्ण व शुध्द उच्चारण कसे करावे याबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले.

### दुसरी घटक चाचणी

दि. १६ जानेवारी २०२४ ते २४.१.२०२४ या कालावधीत इ. १ली ते इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांची दुसऱ्या सत्रातील लेखी दुसरी घटक चाचणी घेण्यात आली.

### मकर संक्रांत सणाची माहिती

दि. १६ जानेवारी २०२४ रोजी शिक्षिका सौ. शीतल हेगडकर यांनी मकर संक्रांत या सणाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### पालक प्रतिनिधी सभा व माता पालक सभा

दि. २०.१.२०२४ रोजी पालक प्रतिनिधी व माता पालक सभा घेण्यात आली. यावेळी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी पालक प्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्दयांवर चर्चा केली.

### मकर संक्रांत कार्यक्रम

**''उब तिळाची**
**गोडवा गुळाचा**
**आपुलकीचा सण हा**
**मकरसंक्रांतीचा''**

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी मकर संक्रांत सण कार्यक्रम मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी सोहम गुरुकुलचे संस्थापक, समुपदेशक डॉ. राजेश्वर चन्ने व त्यांच्या पत्नी सौ. सुजाता चन्ने हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,

संचालक श्री. आनंद कुलकर्णी व डॉ. राजेंद्र कांबळे उपस्थित होते. मकर संक्रांत सणाची माहिती कु. सौमित्र कुलकर्णी इ. ३ री क याने मराठीतून व कु. वृविता ताकवले इ. ४ थी इ. हिने इंग्रजी मधून दिली. प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील शाळेतील विविध स्पर्धांमधून द्वितीय क्रमाकं व शाळाबाह्य स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना सर्व स्पर्धांमध्ये तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले तसेच योग्य ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळाचे वाटप करण्यात आले.

### अभिनंदनीय

कु. शिवम क्षीरसागर इ. ३ री क या विद्यार्थ्याने 'रंगोत्सव सेलिब्रेशन' या राष्ट्रीय पातळीवरील चित्रकला स्पर्धेत **सुवर्ण पदक तसेच थंब प्रिंट पेंटिंग या स्पर्धेत रौप्य पदक मिळविले.**

## माध्यमिक विभाग

### मराठी नाट्यवाचन स्पर्धा

दि. ६ जानेवारी २०२४ रोजी मराठी नाट्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. यात बोस, टागोर, टिळक आणि विवेकानंद या चारही कुलाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वेगवेगळ्या विनोदी विषयांवर नाट्यवाचन सादर करण्यात आले. यात टिळक कुलाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, बोस कुलाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. कनिष्ठ महाविद्यालयातील सहशिक्षिका सौ. मंजिरी पाटणकर यांनी आणि कार्यलयीन सेविका सौ. सीमा पंडीत यांनी परिक्षण केले.

### दुसरी घटक चाचणी

इ. ५वी ते इ. ९ वी ची दुसरी घटक चाचणी परीक्षा दि. १६ जानेवारी २०२४ ते २३.१.२०२४ या कालावधीत घेण्यात आली. तसेच इ. १० वी च्या विद्यार्थ्यांची बोर्ड पूर्व परीक्षा दि. १६ जानेवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२४ या दरम्यान घेण्यात आली.

### तिळगुळ समारंभ

दि. २० जानेवारी २०२४ रोजी मकर संक्रांतीनिमित्त तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विद्यावाचस्पती, राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. डॉ. चारुदत्त आफळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे संचालक श्री. सुनील रेडेकर आणि श्री. आनंद कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या गायक वृंदाने गायलेल्या नांदीने झाली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिक्षिका कु. मोहना नातू यांनी करुन दिला. डॉ. चारुदत्त आफळे यांनी कबिराचा दोहा, द्रोणाचार्य द्रुपद राजा यांची कथा यातील उदाहरणे देत जीवनात शब्दांचा वापर आपल्या बोलण्यामध्ये सावधपणे समजून घेऊन कसा करावा याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांना तिळगुळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

### वृक्षारोपण आणि स्वच्छता उपक्रम

दि. २४ जानेवारी २०२४ रोजी आयकर विभाग, सातारा रोड, पुणे आणि मुक्तांगण इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण आणि स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, मुख्याध्यापिका सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, आयकर आयुक्त (आंतरराष्ट्रीय आयकर) श्री. मेरविन पेज, सहाय्यक आयकर आयुक्त तसेच डॉ. उमेश फाडे, त्यांचे सहकारी तसेच शिक्षिका कु. अनुपमा कर्वे उपस्थित होत्या. यावेळी इ. ८वी ड च्या विद्यार्थ्यांनी शाळेचे पार्किंग व मैदानाची स्वच्छता केली. आयकर अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन यांचे महत्त्व सांगितले.

### अभिनंदनीय

* दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी रामकृष्ण मठ, पुणे येथे आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत माध्यमिक विभागाने प्रथम क्रमांक

प्राप्त केला. सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात स्वामी विवेकानंद यांची पुस्तके मिळाली.

* विद्यार्थिनी कु. आराध्या भुजबळ इ. ७ वी अ हिने राज्यस्तरी जिम्नॅस्टीक्स स्पर्धेत कांस्यपदक मिळविले. तिला उत्कृष्ट जिम्नॅस्टीक खेळाडू म्हणून पारितोषिकही मिळाले.

* विद्यार्थ्यांनी कु. राजलक्ष्मी बोरकर इ. ९ वी क हिने दि. १ ते ४ जानेवारी २०२४ या कालावधीत झालेल्या गर्ल्स आय. पी. एल. क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेतला होता. तिला या स्पर्धेत प्रमुख आणि उत्कृष्ट धावपटू व खेळाडू म्हणून पारितोषिक व पदक प्राप्त झाले.

* गांधी जयंतीनिमित्त राजीव गांधी स्मारक समिती, पुणे यांनी मराठी निंबध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत मला समजलेले बापू या निबंधासाठी विद्यार्थिनी कु. समीक्षा नागवडे इ. ८वी ड हिला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. बक्षीस स्वरूपात चषक, रु. १,०००/- चे रोख पारितोषिकही प्राप्त झाले.

## कनिष्ठ महाविद्यालय

### अभिनंदनीय

दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हा परिषदेतर्फे यांचेतर्फे के. पी. विठोबा मारुती स्टेडीयम, खराडी येथे आयोजित तायक्वांदो या खेळात विद्यार्थी कु. सोहम मिलिंद शेट्टी इ. ११ वी ड याने ब्राँझ पदक मिळविले.

### पीएच. डी. साठी निवड

रसायनशास्त्र विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षिका स्मिता सिंग यांची संशोधनाच्या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांचे संशोधन जर्मनी येथील बर्लिन शहरातील हंबोल्ड या विद्यापीठातून होणार आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय गॅमीफाईड ऑगमेंट रिॲलिटी हा आहे.

या चार वर्षांच्या काळात त्यांना न्युयॉर्क मधील विद्यापीठ तसेच केंब्रिज विद्यापीठ कॅलिफोर्निया येथेही काम करण्याची संधी मिळणार आहे. संस्थेच्या वतीने स्मिता सिंग यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

### प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर (PVSM, AVSM, VSM) (रिटायर्ड), उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर आणि संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संपूर्ण सभेने राष्ट्रगीत गायले. सरचिटणीस कु. जान्हवी चोरगे, इ. १० वी इ हिने सांगितलेली प्रतिज्ञा सगळ्यांनी म्हटली. आर्मी आणि एअर विंगच्या एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी बँडच्या तालावर शानदार मार्च पास्ट सादर केला. विद्यार्थ्यांच्या संगीत वृंदाने देशभक्तीपर गीत सादर केले. मुख्याध्यापिका सौ. मीना राणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि चीनविरुध्द लढलेल्या अनेक युध्दांमध्ये डॉ. डी. बी. शेकटकर यांनी महत्त्वाची भुमिका बजावली आहे. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यातर्फे घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च माध्यमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमधील इ. ५वी आणि इ. ८वी च्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना तसेच एन. सी. सी. शिबिरामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पारितोषिके मिळवलेली आहेत अशा आर्मी आणि एअर विंगच्या एन. सी. सी. कॅडेटनाही बॅच देऊन प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावर्षीचा सांस्कृतिक विजेतेपदाचा चषक टिळक हाऊसने तसेच जनरल विजेतेपदाचा चषक विवेकानंद हाऊसने जिंकला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे ध्येय साध्य करण्यासाठी स्वतःचे ज्ञान सतत अद्ययावत करण्याची गरज आहे तसेच सोशल मिडियापासून लांब रहावे असा यशाचा मंत्र दिला. वंदेमातरम या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पालक, माजी विद्यार्थी, हितचिंतक यांनी युट्युब लिंकद्वारे पाहिले. *

## ❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ❊



दि. २० जानेवारी २०२४
मकर संक्रांतीनिमित्त आयोजित केलेल्या तिळगुळ समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे राष्ट्रीय कीर्तनकार, डॉ. चारुदत्त आफळे यांचे स्वागत करताना संचालक श्री. सुनील रेडेकर, समवेत डावीकडून पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस, मुख्याध्यापिका सौ. मीना राणे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे व संचालक श्री. आनंद कुलकर्णी



दि २३ जानेवारी २०२४ रोजी मकर संक्रांत कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. राजेश्वर चन्ने यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र संपत कांबळे, समवेत डावीकडून उपस्थित शिक्षिका, प्र. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, सौ. सुजाता चन्ने, उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, संचालक श्री आनंद कुलकर्णी



रामकृष्ण मठ, पुणे येथे झालेल्या आंतरशालेय देशभक्तीपर समूह गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेला मुक्तांगण इंग्लिश स्कूलचा संघ

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.१२.२०२३ ते ३१.१२.२०२३**

पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.

**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व



शांताराम मोघे

**●नाव** - **श्री. संजीव शांताराम मोघे, पुणे**
**देणगी** - रु. २,२०,५००/-
**दिनांक** - ५.१२.२०२३
**निमित्त** - कै. शांताराम सिताराम मोघे (मा. वि.) स्मृतिदिनानिमित्त (११ जुलै)
**विनियोग** - संपूर्ण देणगी रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्री. विजय वसंत रानडे, पुणे**
**देणगी** - रु. ५१,०००/-
**दिनांक** - २८.१२.२३
**निमित्त** - कै. वसंत हरी रानडे स्मृतिदिनानिमित्त (२ मार्च)
**विनियोग** - व्याजविनियोग अन्नदान

**●नाव** - **श्रीमती प्रभा विष्णु वैद्य, पुणे**
**देणगी** - रु. ५०,०००/-
**दिनांक** - १३.१२.२३
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - संस्थावाढीसाठी



निलीमा इंगळहळीकर

**●नाव** - **सौ. रश्मी अनिल वैद्य, डोंबिवली**
**देणगी** - रु. ३०,०००/-
**दिनांक** - २२.१२.२३
**निमित्त** - कै. निलीमा बाळकृष्ण इंगळहळीकर स्मृतिदिना निमित्त (३० जून)
**विनियोग** - व्याज विनियोग शिष्यवृत्ती पारितोषिक

**●नाव** - **राष्ट्र तेज मंच, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत



नीळकंठ केकाणे

**●नाव** - **सौ. संगीता नीळकंठ केकाणे, पुणे**
**देणगी** - रु. २१,५००/-
**दिनांक** - ६.१२.२३
**निमित्त** - कै. नीळकंठ कृष्णाजी केकाणे स्मृतीदिनानिमित्त (१६ जानेवारी माघ शुध्द ८)
**विनियोग** - देणगी रु. ११,५००/- मिष्टान्नासह संपूर्ण भोजन (१६ जानेवारी २४), रु. १०,०००/- व्याजविनियोग अन्नदान (माघ शुध्द ८)

**●नाव** - **सौ. आदिती मनोहर जोशी, मुंबई**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २.१२.२३
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - संस्था वाढीसाठी


प्रभावती भालेराव

**●नाव** - **श्री. हेमंत रामचंद्र भालेराव, पुणे**
**देणगी**- रु. २०,०००/-
**दिनांक** - ६.१२.२३ व २८.१२.२०२३
**निमित्त** - कै. सौ. प्रभावती रामचंद्र भालेराव स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - नामफलक लावणेसाठी

**●नाव** - **श्रीमती स्नेहल मोहन कुलकर्णी, पुणे**


रजनी कुलकर्णी


मोहन कुलकर्णी

**देणगी** - रु. १७,०००/-
**दिनांक** - ६.१२.२३
**निमित्त** - कै. रजनी शंकर कुलकर्णी (२४ डिसेंबर रु. ५,०००) कै. मोहन शंकर कुलकर्णी (२७ डिसेंबर रु. ११,५००) स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. ५,०००/- व्याजविनियोग अन्नदान, देणगी रु. १२,०००/- संपूर्ण रक्कम विनियोग चालूवर्षासाठी मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्री. कन्हैयालाल रणछोडदास सुंगधी, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २२.१२.२३
**निमित्त** - कै. शकुंतला रणछोडदास सुगंधी (२५ जुलै रु. ५,०००/-) व कै. रणछोडदास मनमोहनदास सुंगधी (४ फेब्रुवारी रु. १०,०००/-) स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - व्याजविनियोग अन्नदान व मिष्टान्न


उषाताई नातू

**●नाव** - **श्री. श्रीकृष्ण गदाधर नातू, पुणे**
**देणगी** - रु. १४,०००/-
**दिनांक** - २६.१२.२३
**निमित्त** - कै. श्रीमती उषाताई गदाधर नातू स्मृतिदिनानिमित्त (२२ जानेवारी)
**विनियोग** - संपूर्ण देणगी रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. गुरुदास गुलाबराव पवार, पुणे**
**देणगी** - रु. १३,०००/-
**दिनांक** - २३.१२.२३
**निमित्त** - श्रीदत्त जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **सौ. दिप्ती सचिन सरलष्करे, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-


विजया पंडित


मुरलीधर पंडित

**दिनांक** - २६.१२.२३
**निमित्त** - कै. सौ. विजया मुरलीधर पंडित
(१७ ऑगस्ट)
डॉ. कै. मुरलीधर वामन पंडित
(२८ नोव्हेंबर) स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. १,०००/- संपूर्ण रक्कम विनियोग चालूवर्षासाठी अन्नदान, रु. १०,०००/- व्याजविनियोग अन्नदान

**●नाव - श्रीमती उर्मिला लक्ष्मण जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/- **दिनांक** - ३०.१२.२३
**निमित्त** - कै. लक्ष्मण सोनोपंत तथा अण्णा जोशी स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


दिनकर सापटणेकर

**●नाव - श्री. सुबोध दिनकर सापटणेकर, पुणे**
**देणगी** - रु. १०,५००/-
**दिनांक** - ९.१२.२३
**निमित्त** - कै. दिनकर विठ्ठल सापटणेकर स्मृतिदिनानिमित्त (मार्गशिष वद्य ५)
**विनियोग** - देणगी रु. १०,०००/- व्याजविनियोग अन्नदान, चालूवर्षासाठी रु. ५००/- संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


कृष्णराव राजे

**●नाव - श्री. अभय कृष्णराज राजे, पुणे**
**देणगी** - रु. १०,५००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - कै. कृष्णराव मारुती राजे स्मृतिदिनानामित्त (२५ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी रु. १०,०००/- व्याजविनियोग अन्नदान, रु. ५००/- संपूर्ण रक्कम विनियोग चालूवर्षासाठी अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**●नाव - श्री. श्रीकृष्ण भालचंद्र करमरकर, पुणे**


सुधा करमरकर


लिलाबाई करमरकर

**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ८.१२.२३
**निमित्त** - कै. सौ. सुधा श्रीकृष्ण करमरकर
(३० नोव्हेंबर)
कै. सौ. लिलाबाई भालचंद्र करमरकर
(१९ मार्च) स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - व्याजविनियोग अन्नदान


गजानन संत

**●नाव - ॲड. ज्ञानराज गजानन संत, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ७,००१/-
**दिनांक** - ९.१२.२३
**निमित्त** - कै. गजानन रंगनाथ संत (मा. वि.) जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. मधुकर गोविंद वाघचौरे, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ७,५५१/-
**दिनांक** - १२.१२.२३
**निमित्त** - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. चंद्रहास यशवंत पाध्ये, पुणे**
**देणगी** - रु. ९,०००/- **दिनांक** - १३.१२.२३
**निमित्त** - कै. अनिल केशव कर्वे (५ जून)
कै. केशव गजानन कर्वे (१ जुलै)
कै. सुशिला केशव कर्वे (२९ नोव्हेंबर)
कै. तारामती यशवंत पाध्ये (६ फेब्रुवारी)
कै. यशवंत केशव पाध्ये (८ मे)
कै. शीला यशवंत पाध्ये (११ फेबुवारी)
कै. बाळकृष्ण जाधव (१ जुलै)
कै. सुमती वसंत गुप्ते (१८ जुलै)
कै. वसंत रामकृष्ण गुप्ते (२ मे)
स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. जयंत नारायण अंबीकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,१२५/-
**दिनांक** - १५.१२.२३
**निमित्त** - कै. नारायण रामचंद्र अंबीकर
स्मृतिदिनानिमित्त (मार्गशिर्ष शुध्द ४)
**विनियोग** - देणगी रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी


अनिकेत जाधव

●**नाव** - **श्रीमती हेमा हनुमंत जाधव, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - कै. अनिकेत हनुमंत जाधव स्मृतिदिनानिमित्त (१६ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती कुमोदिनी पार्थसारथी, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २३.१२.२३
**निमित्त** - कै. रुक्मिणी वारदाचार
स्मृतिदिनानिमित्त (पौष शुध्द ११)
**विनियोग** - व्याजविनियोग अन्नदान

## देणगी रु. ४,००१ ते रु. ५,०००/-

●**नाव** - **श्री. अशोक ए. पाटणकर, मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ७.१२.२३
**निमित्त** - कर्नल कै. के. जी. विद्वांस (रिटा) व
कै. सौ. आशा के. विद्वांस
स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. आनंद विष्णु वाकणकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ८.१२.२३
**निमित्त** - कै. विष्णु विनायक वाकणकर व
कै. विजया विष्णु वाकणकर
स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनायोग मिष्टान्न

●**नाव** - **सौ. रत्नप्रभा रत्नाकर हेगडे, मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १३.१२.२३
**निमित्त** - कै. संजीव गोविंद जोशी स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
शैक्षणिक मदत देण्यासाठी

●**नाव** - **श्रीमती रोहिणी रघुनाथ उमराणी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १५.१२.२३
**निमित्त** - कै. रघुनाथ गजानन उमराणी
स्मृतिदिनानिमित्त (२२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


हरी केशव जोशी

**●नाव - मा. विश्वस्त हरीमालिनी जोशी ट्रस्ट, सातारा**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - कै. हरी केशव जोशी जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


गणेश हरी दंडगे

**●नाव - सौ. दिपा दिलीप गुमास्ते, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २८.१२.२३
**निमित्त** - कै. गणेश हरी दंडगे (मा. वि.) स्मृतिदिनानिमित्त (२८ डिसेंबर)
**विनियोग** - व्याजविनियोग मिष्टान्न

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

**●नाव - श्री. चिंतामण सुदामराव तनपुरे, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/- **दिनांक** - ४.१२.२३
**निमित्त** - कै. सुदामराव बाबुराव तनपुरे स्मृतिदिनानिमित्त (कार्तिक वद्य ७)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. मोहन व्यंकटेश चिंचणीकर व सौ. विनिता मोहन चिंचणीकर पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - १४.१२.२३


सुहासिनी मालशे

**निमित्त** - कै. व्यंकटेश गणेश चिंचणीकर, कै. विजया व्यंकटेश चिंचणीकर, कै. श्रीधर महादेव मालशे, कै. सौ. सुहासिनी श्रीधर मालशे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


सौ. जयश्री पळसुले

**●नाव - कु. शुभा श्रीकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. ३,००२/-
**दिनांक** - ६.१२.२३ व दि. १६.१२.२३
**निमित्त** - कै. सौ. जयश्री श्रीकृष्ण पळसुले स्मृतिदिनानिमित्त (कार्तिक वद्य १०) (मार्गशिष शुध्द १०)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

**●नाव - श्री. गिरीष श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - ७.१२.२३
**निमित्त** - कै. नीळकंठ विठ्ठल लिमये स्मृतिदिनानिमित्त (२९ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. शरदचंद्र विश्वनाथ राजर्षी, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - १४.१२.२३
**निमित्त** - कै. विश्वनाथ त्र्यंबक राजर्षी स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. अभिजित पाठक, (मा.वि.), पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**●नाव** - **श्री. कुणाल चेतन परुळेकर, पनवेल**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - ४.१२.२३
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. माधव नारायणराव रानडे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ५.१२.२३
**निमित्त** - कै. नारायणराव सदाशिव रानडे व कै. लक्ष्मीबाई नारायण रानडे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


बाळकृष्ण मुंडी

**●नाव** - **श्री.विनय बाळकृष्ण मुंडी, पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - ७.१२.२३
**निमित्त** - कै. बाळकृष्ण नारायण मुंडी स्मृतिदिनानिमित्त (७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग अन्नदान


गजानन संत

**●नाव** - **सौ. विदुला योगेश मोघे, पुणे**
**देणगी** - रु. १,२००/-
**दिनांक** - ११.१२.२३
**निमित्त** - कै. गजानन रंगनाथ संत (मा. वि.) जयंतीनिमित्त (११ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न शतायुभवनमधील सभासदांसाठी


नारायण ओक

**●नाव** - **श्री. सुरेश नारायण ओक, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - कै. नारायण व्यंकटेश ओक स्मृतिदिनानिमित्त (१७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. एम. व्ही. राव, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १६.१२.२३
**निमित्त** - कै. मंडा बंगाराम स्मृतिदिनानिमित्त (२० डिसेंबर)
**विनियोग** - संपूर्ण देणगी विनियोग अन्नदान


श्रीधर स्वामी

**●नाव** - **श्री. चंद्रशेखर नरहर भट, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २६.१२.२३
**निमित्त** - श्री श्रीधर स्वामी महाराज स्मृतिदिनानिमित्त (मार्गशिष शुध्द १५)
**विनियोग** - व्याज विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. श्रीकांत वसंत करंदीकर, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २९.१२.२३
**निमित्त** - श्री. वसंत नारायण करंदीकर स्मृतिदिनानिमित्त (२९ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

**●नाव - श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - ७.१२.२३
**निमित्त** - कै. रमेश शंकर करमरकर स्मृतिदिनानिमित्त (७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. रविंद्र सुरेश सप्तर्षी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १८.१२.२३
**निमित्त** - कै. वत्सला सुरेश सप्तर्षी स्मृतिदिनानिमित्त (१९ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. प्रमोद गोपाळ नातु, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १९.१२.२३
**निमित्त** - कै. शोभना गोपाळ नातू स्मृतिदिनानिमित्त (१५ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


मारुती कुलकर्णी

**●नाव - श्री. कृष्णाजी मारुती कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १९.१२.२३
**निमित्त** - कै. मारुती दत्तात्रय कुलकर्णी स्मृतिदिनानिमित्त (मार्गशिष ५)
**विनियोग** - व्याज विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. अरविंद मनोहर मुजुमदार, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २२.१२.२३
**निमित्त** - कै. मनोहर शंकर मुजुमदार स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील**

**●नाव - श्री. सूरज दिवाकर कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. २०१/-
**दिनांक** - १.१२.२३
**निमित्त** - कै. सुप्रिया संजीव देशपांडे स्मृतिदिनानिमित्त (१ जानेवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. मुकुंद नामदेव आंबेकर, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १२.१२.२३
**निमित्त** - कै. नामदेव मारुती आंबेकर २९ व्या स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - सौ. मेघना नचिकेत मोघे, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १६.११.२३
**निमित्त** - कै. पुरुषोत्तम बाजीराव कुसूरकर स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्रीमती ज्योती सुधीर करंदीकर, पुणे**
**देणगी** - रु. १००/-
**दिनांक** - २६.१२.२३
**निमित्त** - कै. आर. के. करंदीकर व कै. श्रीमती इंदिराबाई आर. करंदीकर स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

## वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या



श्री. हसमुख पटेल

**नाव** - **श्री. हसमुख शिवाभाई पटेल, पुणे**
**देणगी** - रु. १,२५,०००/-
**दिनांक** - १४.१२.२३
**निमित्त** - स्वतःचे वयास ८१ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त (६ ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी रु. १,००,०००/- व्याजविनियोग संस्थेच्या एम. आय. पी. टी. मधील तृतीय वर्षातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक देण्यासाठी
देणगी रु. २५,०००/- संपूर्ण विनियोग शिष्यवृत्ती पारितोषिक वरीलप्रमाणे चालू वर्षासाठी



श्री. श्रीकृष्ण नातू

**नाव** - **श्री. श्रीकृष्ण गदाधर नातू, पुणे**
**देणगी** - रु. १४,०००/-
**दिनांक** - ५.१२.२३
**निमित्त** - स्वतःचे वाढदिवसानिमित्त (२९ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी

●**नाव** - **श्री. संजय सातपुते, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १६.११.२३
**निमित्त** - समर्थ प्रतिष्ठान २४ व्या वर्धापनदिनानिमित्त
**विनियोग** - संस्थावाढीसाठी

●**नाव** - **सौ. दिप्ती सचिन सरलष्करे, पुणे**



श्री. सचिन व सौ. दिप्ती सरलष्करे

**देणगी** - रु. ८,५००/-
**दिनांक** - २६.१२.२३
**निमित्त** - स्वतःच्या विवाह वाढदिवसानिमित्त (मार्गशिष शुध्द १५)
**विनियोग** - देणगी रु. ५,०००/- व्याज विनियोग अन्नदान, देणगी संपूर्ण विनियोग रु. ३,५००/- मिष्टान्न

●**नाव** - **श्री. अमोल वसंतलाल मुथ्या, पुणे**
**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - १.१२.२३
**निमित्त** - सौ. मनिषा अमोल मुथ्या व स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. चंद्रहास मारुती बहिरट, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/- **दिनांक** - २०.१२.२३
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना पावभाजी देण्यासाठी

●**नाव** - **श्री. मनोहर देव, पुणे**
**देणगी** - रु. ३,९०१/- **दिनांक** - १९.१२.२३
**निमित्त** - सौ. सुनीता व मनोहर देव यांचे विवाह वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत देण्यासाठी

***

**वस्तुरुप देणगी अंदाजे मूल्य रु.**

१) **स्वयंप्रकाशी चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे**
गहू ७८० नग रु. ३१,२००/-

२) **श्री. अे. के. लिमये, पुणे**
श्रीमदभग्वदगीता श्लोकार्थसहित,
मराठी पुस्तके ४५० नग, रु. १३,५००/-

३) **श्रीमती हेमा हनुमंत जाधव, पुणे**
केक १४५ नग, चॉकेलट ४५० नग,
खजुरबालुशाही १४५ नग, नॅपकिन १४५ नग,
पॅड २५ नग, बॉडीलोशन १४५ नग,
रु. ९,८००/-

४) **श्री. हरी ओम मालशे, पुणे**
तांदुळ ७९ कि., साखर ४० कि., रवा ४२ कि.,
रु. ६०८०/-

५) **श्री. विनायक शंकर रास्ते, पुणे**
गहू ३० कि., साखर २० कि., तांदुळ ५ कि.,
गुळ ५ कि., रु. २,८३०/-

६) **श्री. सौरभ तुकाराम कसबे, पुणे**
साऊंड सिस्टिम १ नग, रु. २,४००/-

७) **श्री. संजय श्रीधर केळकर, पुणे**
कापडी टोपी १६ नग, पिशवी १०० नग
रु. २,०००/-

८) **श्री. आदित्य प्रदिप लिमये, पुणे**
गॅस शेगडी, आरसा, पाण्याचा कॅन,
पोळ्यांचा डबा, ट्रव्हल बॅग ३ नग,
रु. १,५०१/-

९) **सौ. मेघना नचिकेत मोघे, पुणे**
ज्वारी १० कि., तांदुळ १० कि., रु.१,०००/-

१०) **श्री. अभिजीत अरुण पाठक, पुणे**
पेन १५० नग, रु. ७००/-

११) **श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
साखर ५ कि., रवा ५ कि., रु. ४००/-

१२) **सौ. सीमा मोहन कुलकर्णी, पुणे**
साखर १० कि., रु. ४००/-

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर – मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **संचालक – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**दि. २१.१२.२०२३ ते २०.१.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - **श्री. श्रीरंग जनार्दन वैद्य, (मा. वि.) ठाणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ८.१.२०२४
**विनियोग** - कै. जनार्दन शांताराम वैद्य पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३ - २४ देण्याकरिता

**नाव** - **श्री. चंद्रकांत गोटन बागुल, ग्रंथपाल, विद्याभवन हायस्कूल नं. २**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २.१.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, नेरुळ–नवी मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **संचालक – श्री. दिनेश मिसाळ**

**दि. १.१२.२०२३ ते १५.१२.२०२३**

पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.

**नाव** - **मेसर्स प्युअर एअर कंडीशन व रेफ्रिजरेशन, नवी मुंबई**
**देणगी** - रु. २०,०००/- **दिनांक**-२७.१.२०२४
**विनियोग** - नेरुळ शाखा वाढीसाठी

**नाव** - **श्रीमती पूजा बी. सहाय, नवी मुंबई**
**देणगी** - रु. १५,०००/- **दिनांक**-१४.१२.२०२३
**विनियोग** - नेरुळ शाखा वाढीसाठी

**नाव** - **पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग, मुंबई**
**देणगी** - रु. ९,०००/- **दिनांक**-१५.१.२०२४
**विनियोग** - विद्याभवन नेरुळ येथील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी (मराठी माध्यम रु. ५,०००/- इंग्रजी माध्यम रु. ४,०००/-)

**नाव** - **श्री. संजय राजाराम सपकाळ, नवी मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-**दिनांक** -६.१.२०२४
**विनियोग** - नेरुळ शाखा वाढीसाठी


श्रीमती रसिका मुळीक

**नाव** - **श्रीमती रसिका पांडुरंग मुळीक, (मा.वि.), नवी मुंबई**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १५.१.२०२४
**निमित्त** - वडिल श्री. पांडुरंग मुळीक यांच्या वाढदिवसानिमित्त (दि. १५.१.२०२४)
**विनियोग** - नेरुळ शाखा वाढीसाठी

***

### निधन वार्ता


रत्नाकर क्षीरसागर

✻ संस्थेचे माजी विद्यार्थी न्या. रत्नाकर क्षीरसागर यांचे दि. १२.१.२०२४ रोजी वयाच्या ५९ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

✻ संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. विशाल विजय नलावडे यांच्या मातोश्री श्रीमती सीमा विजय नलावडे यांचे शनिवार दि. १२ जानेवारी २०२४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !**

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगाव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी**
**कुलसचिव : श्री. अमोल जोशी**
**ऑक्टोबर २०२३**

वस्तुरुप देणगी

**नाव** - **श्रीमती श्यामला कृष्णाजी कुलकर्णी, नाशिक**
**देणगी** - रु. ४,५००/- प्रथमोपचार साहित्य
**दिनांक** - १०.१०.२०२३
**निमित्त** - कै. कृष्णाजी नारायण कुलकर्णी यांच्या पुण्यस्मरणार्थ

**नाव** - **श्री. सुकदेव लहानू निंबेकर, तळेगाव (अं)**
**देणगी** - रु. ५४०/- चा एक गणवेश
**दिनांक** - १०.१०.२०२३

***

## ❊ दि. २६ जानेवारी २०२४ प्रजासत्ताक दिन क्षणचित्रे ❊




↑ प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. मीना राणे व सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी



← विद्यानगरी, पुणे ९ आवारामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर ध्वजास सलामी देताना प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर (PVSM, AVSM, VSM) (रिटायर्ड), समवेत डावीकडून संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर मुख्याध्यापिका सौ. मीना राणे, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड आदि मान्यवर



↑ प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचा सत्कार करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत डावीकडून संचालक श्री. रमेश कुलकर्णी आणि डॉ. राजेंद्र कांबळे



← संस्थेच्या मुख्यशाखेमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर ध्वजास सलामी देताना प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून प्राचार्य वि. पां. गावडे, मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी आणि डॉ. राजेंद्र कांबळे

**Regd. Newspaper**
**Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001***
**[Publication Date 13.2.2024 Posting Date 15.2.2024]**
**SAMACHAR - RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016**
**License No. WPP - 56/2023-2025**



सुप्रा कार पारितोषिक विजेते विद्यार्थी आणि मार्गदर्शक प्राध्यापक
श्री. विशाल चव्हाण यांचा सत्कार प्रसंगी उपस्थित मान्यवर




**※ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि जी. के. पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ※**
क्युरिऑसम टेक संस्थे मार्फत 'कारी मोटर स्पीडवे' कोईमतूर, तमिळनाडू येथे आयोजित 'फॉर्म्युला भारत २०२४'
या 'आंतरराष्ट्रीय स्टुडन्ट फॉर्मुला कार डिझाईन व रेसिंग स्पर्धे'मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर
द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविलेला यंत्र अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांचा संघ

**♦ पुणे विद्यार्थी गृह ♦**
▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७
कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे